बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बीड | शुक्रवार,दि.४ ऑक्टोबर २०२४|वर्षे४रे | अंक६३वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार

पुणे:बदलापुरात अत्याचाराची घटना ताजी असताना पुण्यातही दोन सहा वर्षांच्या चिमुकल्या मुलींवरील अत्याचाराची संतापजनक घटना समोर आली आहे. पुण्यात वानवडी परिसरात एका नामांकीत शाळेच्या स्कूल व्हॅनमध्ये त्या व्हॅनच्या चालकानेच चिमुकल्या मुलींवर अत्याचार केल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. आरोपी नराधमाने सलग चार दिवस पीडित मुलींवर अत्याचार केला. पीडित मुलींना त्रास जाणवू लागल्यानंतर संबंधित प्रकार उघडकीस आला. ४५ वर्षीय आरोपीकडून ६ वर्षीय चिमुकलीसह तिच्या मैत्रिणीवर ४ दिवसांपासून अत्याचार सुरु होता. आरोपी नराधम हा एका नामांकीत शाळेतील स्कूल बसमध्ये काम करत होता. आरोपी चिमुकलींना पुढे सीटवर बसवत होता.



# गरबा कार्यक्रमात फक्त हिंदूंना प्रवेश?

### कार्यक्रमाला येणाऱ्यांचे आधार कार्ड तपासा
### विश्व हिंदू परिषदेने गरबा आयोजकांकडे मागणी
### कोकण प्रांतात पत्रक काढून आवाहन केले

नागपूर/पुण्यभूमी प्रतिनिधी

**नवरात्रोत्सवादरम्यान आयोजित होणाऱ्या गरबा नृत्याच्या कार्यक्रमात फक्त हिंदू धर्मीयांना प्रवेश द्या, त्यासाठी आधार कार्ड तपासा, अशी मागणी विश्व हिंदू परिषदेने गरबा आयोजकांकडे केली आहे. कार्यक्रमस्थळी आधार कार्ड तपासण्यात यावे आणि टिळा लावून प्रवेश देण्यात यावा, मुस्लिमांना प्रवेश देण्यात येवू नये, अशी मागणी विश्व हिंदू परिषदेचे महाराष्ट्र आणि गोवा प्रांत मंत्री गोविंद शेंडे यांनी केली आहे.**

यासंदर्भात शेंडे म्हणाले की, कोकण प्रांतात आम्ही पत्रक काढून आवाहन केले. तर इतर प्रांतात वैयक्तिक संपर्क साधून आवाहन करीत आहोत.एखाद्या आयोजकाकडे मनुष्यबळाची कमतरता असल्यास आणि त्यांनी मागणी केल्यास आम्ही कार्यकर्ते देवू. गरबा हा श्रद्धेचा आणि भक्तीचा विषय असून ते फक्त नृत्य नाही, तो इव्हेंटही नाही, त्यामुळे गरबा आयोजनाच्या स्थळी देवीबद्दल श्रद्धा नसलेल्या, भक्ती नसलेल्यांनी प्रवेशच करू नये. तिथे फक्त हिंदू धर्मीयांनी प्रवेश करावा, अशी मागणी शेंडे यांनी केली आहे.गरबा उत्सवात श्रद्धा नसताना, देवी बद्दल भक्ती नसतानाही अनेक इतर धर्मीय तिथे प्रवेश घेतात आणि हिंदू महिला आणि तरुणींची छेड काढतात. पुढे लव्ह जिहाद सारख्या समस्या निर्माण होतात. त्यामुळे गरबा आयोजन करणाऱ्या मंडळांनी आधीच काळजी घ्यावी, असे गोविंद शेंडे म्हणाले.यासोबतच विहिंपने गरबा उत्सव आयोजन करणाऱ्यांना मंडळांना संपर्क साधून तशी व्यवस्था करण्यास सांगितले आहे. गरबा उत्सवात येणाऱ्यांचे आधार कार्ड तपासणे आणि दरावरील व्यवस्थेसाठी आयोजन मंडळांकडे कार्यकर्ते नसल्यास विहिंप आपले कार्यकर्ते मदतीसाठी उपलब्ध करून देणार आहे.

### इतर धर्मिय लोक प्रवेश करतात!

गेल्या काही वर्षांपासून गरबा उत्सवात फक्त हिंदू धर्मीयांनाच प्रवेश देण्यात यावा अशी मागणी विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाकडून केली जात आहे. गरब्याच्या कार्यक्रमात इतर धर्मिय लोक प्रवेश करतात आणि त्यामुळे लव्ह जिहाद सारखी प्रकरणे घडतात, असा आरोप हिंदुत्ववादी संघटनांकडून केला जात आहे. यावरून आता दरवर्षी वाद होत आहे.

### सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण!


खासकरून गुजरातमध्ये अनेक ठिकाणी गरबा आयोजकांकडून फक्त हिंदूंना या ठिकाणी प्रवेश देण्यात येतो आणि इतर धर्मीयांना विरोध केला जातो. त्यामुळे या ठिकाणी कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याचा आरोपही केला जात आहे.

# हिंदूंना शिव्या देणाऱ्या भिडला अटक करा

### आक्रमक: संभाजी ब्रिगेडची मागणी

सांगली/

संभाजी बिग्रेडचे नेते संतोष शिंदे यांनी संभाजी भिडे यांना त्यांच्या वादग्रस्त वक्तव्याप्रकरणी अटक करण्याची मागणी केली आहे. मनोहर उर्फ संभाजी भिडे हा अत्यंत विकृत माणूस आहे. हिंदू स्त्रिया असो की हिंदू समाज यांच्या विषयी नेहमी वादग्रस्त वक्तव्य करत असतो. समाजा समाजात जातीय आणि धार्मिक तेढ निर्माण करणारा आणि महाराष्ट्रात दंगली घडवणारा मनोहर भिडे महाराष्ट्राला लागलेला कलंक आहे, अशी टीका त्यांनी केली आहे.शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक संभाजी भिडे यांच्या आणखी एका नव्या वक्तव्याने वाद निर्माण झाला आहे. गणपती उत्सव, नवरात्र उत्सव हे आता इव्हेंट झाले आहेत. हिंदू समाजाला गांडू बनवत आहेत, असं वादग्रस्त वक्तव्य



संभाजी भिडे यांनी केलं आहे. तसेच महामूर्ख जमात म्हणजे हिंदू जात, असंदेखील वक्तव्य संभाजी भिडे यांनी केलं आहे. त्यांच्या या वक्तव्यावर आता विविध स्तरावरुन टीका केली जात आहे. संभाजी पान २ वर...

### वय झाल्यामुळे मानसिक स्थैर्यावर परिणाम',

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनीदेखील संभाजी भिडे यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली आहे. संभाजी भिडेंच्या डोक्यात काय सुरू असतं हे समजायला मार्गच नाही. पूर्ण समाजाला गांडू म्हणणं हे त्यांना शोभत नाही. संभाजी भिडे यांचं वय झाल्यामुळे त्यांच्या प्रकृतीमध्ये आणि मानसिक स्थैर्यावर परिणाम झाला आहे. त्यामुळे त्यांच्या बोलण्याकडे फारसं महत्त्व देणं काही योग्य वाटत नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार सगळ्यातच बट्ट्याबोळ झालेला आहे. हिंदू समाजाचे ते एकटेच करतेधरते आहेत. हिंदू समाज त्यांच्या बोलण्यानुसार ऐकतो हा त्यांचा गोड गैरसमज आहे. मला असं वाटतं, वयानुसार मानसिक संतुलन ढळतं, असं म्हणतात. त्यांनी तपासून घ्यावे, अशी टीका जितेंद्र आव्हाड यांनी केली आहे.

# शेतकरी महासन्मान योजनांच्या निधीचे वितरण

### धनंजय मुंडे: वाशीममधून होणार वितरित

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

पी.एम. किसान सन्मान निधी योजना व नमो शेतकरी महासन्मान निधी योजना या योजनांचे माहे ऑगस्ट २०२४ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीतील अनुक्रमे १८ वा व पाचवा हप्ता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते शनिवार ०५ ऑक्टोबर, २०२४ रोजी सकाळी ११.०० वा. वाशिम येथील समारंभात वितरीत करण्यात येणार आहे.यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, यवतमाळ -वाशिमचे पालकमंत्री संजय राठोड



आदी मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.

शेतक-यांना निश्चित उत्पन्न देण्याकरीता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी. एम. किसान) योजना माहे फेब्रुवारी, २०१९ पासून सुरु केली आहे. या योजनेच्या निकषांनुसार सर्व पात्र शेतकरी कुटुंबास (पती, पत्नी व त्यांची १८ वर्षाखालील अपत्ये) रु. २०००/- प्रती हप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात प्रती वर्षी रू. ६०००/- त्यांच्या आधार व डीबीटी संलग्न सक्रीय बँक खात्यात लाभ जमा करण्यात येत आहे. पी. एम. किसान योजने अंतर्गत दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ अखेर पान २ वर...

# आता अंतरवाली सराटीमधून नाही तर

### चर्चेतले: मनोज जरांगे यांनी घेतला निर्णय

पैठण/ पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. मराठा आरक्षण आंदोलन त्यांनी राज्यातील गावागावापर्यंत पोहचवले. जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटीमधून मराठा आरक्षणासाठी ते लढा देत आहेत. त्यामुळे गेल्या तेरा महिन्यापासून अंतरवाली सराटी गावाचे नाव राज्यभर पोहचले. परंतु आता मनोज जरांगे पाटील यांचा संपर्क पत्ता बदलणार आहे. ते आता




सोलापूर-धुळे महामार्गावरील पैठण फाट्यावर आपले कार्य उघडत आहे. या ठिकाणी छत्रपती भवन नावाने पान २ वर...

# तुरुंगातील जातीभेद हटवू शकलो नाहीत

### निर्णय: सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी व्यक्त केली खंत

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारतातील कारागृहात जातीवर आधारित भेदभाव होत असल्याबाबत खंत व्यक्त करून सर्वोच्च न्यायालयाने आज ऐतिहासिक असा निर्णय दिला. कैद्यांच्या जातीवर आधारित भेदभाव कारागृहात करण्यात येऊ नये, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. भारतातील सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांनी तीन महिन्यांमध्ये कारागृह नियमावलीत सुधारणा करावी, असेही निर्देश देण्यात



आले आहेत. भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाली, तरीही आपण जातीभेदाचे निर्मूलन करू शकलो नाहीत, याबद्दलही पान २ वर...

### कैद्याच्या जातीचा उल्लेख कशाला?

सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण विषय याचिकेच्या माध्यमातून पुढे आणल्याबद्दल याचिकाकर्त्यांचे आभार व्यक्त केले. खंडपीठाने म्हटले की, संविधानाने सर्वांना समानतेचा अधिकार दिला आहे. अनुच्छेद १७ मध्ये अस्पृश्यतेवर बंदी घालण्यात आली आहे. तर अनुच्छेद २१ नुसार सर्वांना सन्मानाने जगण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. सर्व कारागृहात याचे पालन झाले पाहीजे. कारागृहात कैद्यांच्या जातीवरून त्यांना विशिष्ट काम देणे किंवा त्यांची राहण्याची वेगळी व्यवस्था करणे, असे भेद राहता कामा नयेत. तुरुंगात कैद्यांच्या जातीवरून त्यांची ओळख होता कामा नये. कैद्याच्या जातीचा कॉलमच कारागृहात असता कामा नये.

**निर्णय** निकष काय होते? कोणते फायदे मिळणार?

# मराठी भाषेला मिळाला अभिजात दर्जा

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

संपूर्ण महाराष्ट्राला व जगभरात पसरलेल्या मराठीजनांना अभिमान वाटावा अशी बातमी नुकतीच समोर आली आहे. केंद्र सरकारने मराठी भाषेला 'अभिजात दर्जा' देण्याचा निर्णय घेतला आहे. विधानसभा निवडणुकीच्या आधी केंद्र सरकारने गेल्या अनेक दशकांपासूनची मराठी जनतेची ही मागणी पूर्ण केली आहे. अभिजात दर्जा मिळवण्यासाठीचे सर्व निकष मराठी भाषेने पूर्ण केले आहेत. मराठीसह एकूण पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला आहे. मराठीसह पाली, प्राकृत, आसामी व बंगाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. पान २ वर...




### अभिजात दर्जा मिळणे म्हणजे काय?

देशात आतापर्यंत सहा भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला आहे. तमिळ भाषेला सर्वात आधी २००४ साली अभिजात दर्जा प्रदान करण्यात आला. त्यापाठोपाठ संस्कृत (२००५), कन्नड (२००८), तेलुगु (२००८), मल्याळम (२०१३) आणि ओडिया (२०१४) या भाषांना अभिजात दर्जा बहाल केला गेला. हा दर्जा मिळणे म्हणजे भाषेच्या समृद्धीवर राजमान्यतेची मोहोर उमटते.

### अभिजात दर्जा मिळाल्याने कोणते फायदे मिळणार?

अभिजात दर्जा असलेल्या भाषा अधिक समृद्ध होण्यासाठी केंद्र सरकारकडून दरवर्षी सुमारे २५०-३०० कोटी रुपयांचे अनुदान दिले जाते. भाषा भवन उभारणे, त्या भाषेतील ग्रंथ व साहित्याचा प्रसार करणे, ग्रंथालये उभारणे, देशभरातील विद्यापीठे किंवा अन्य संस्थांमार्फत भाषेचा प्रसार यासह इतर प्रकल्पांसाठी आर्थिक पाठबळ दिलं जातं. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यास त्या भाषेतील विद्वानांसाठी दरवर्षी दोन राष्ट्रीय पुरस्कार जाहीर केले जातात. सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर स्टडिजची स्थापना केली जाते. प्रत्येक विद्यापीठात त्या त्या भाषेचा अभ्यास करण्यासाठी विशेष केंद्र उभारलं जातं. भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये मराठी शिकण्याची व्यवस्था केली जाणार. प्राचीन ग्रंथांचा अनुवाद केला जाणार.



## ‘बुलेट’ला ओढ ‘बॅलट’ची?

देशबांधवांकडून होणारी उपेक्षा, धर्म या योगायोगामुळे सतत घेतला जाणारा संशय, ‘कडे–कडे’ने जगणे नशिबी आल्याने निष्ठांबाबत निर्माण केले जाणारे प्रश्न या आणि अशा अन्य अनेक मुद्द्यांवरील नकारात्मकता आणि नैराश्य बाजूस सारत जम्मू–काश्मिरातील नागरिकांनी भरघोस मतदान केले ही हरखून जावे अशी बाब. त्या राज्यांतील मतदारांस आपल्या लोकशाही निष्ठा व्यक्त करण्याची ही संधी मिळाली याचे श्रेय सर्वोच्च न्यायालयाचे. मतदान शांततेत पार पाडल्यावर विजयी खुणा आणि मुद्रेद्वारे निवडणूक आयोग भले आपले ‘यश’ साजरे करत असेल. पण त्यास यासाठी भरीस घातले सर्वोच्च न्यायालयाने. हे न्यायालय कणखरपणे निवडणुकीचा आग्रह न धरते तर या राज्यांतील नागरिकांस अजूनही त्यापासून वंचित राहावे लागते. तेव्हा सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानून या निवडणुकीचे महत्त्व इतके का हे लक्षात घ्यायला हवे. या राज्यातील मतदानाच्या शेवटच्या फेरीत जवळपास ६९.२१ टक्के इतके मतदान झाले. अत्यंत दुर्गम अशा काही मतदारसंघांत तर हे प्रमाण ८१ टक्क्यांहूनही अधिक आहे. सुखात आयुष्य जगणाऱ्या चंगळवादी दक्षिण मुंबईने यापासून धडा घ्यायला हरकत नाही. नव्या विधानसभेच्या ९० जागांसाठी ८७३ इतके उमेदवार रिंगणात आहेत आणि एकाही मतदारसंघात दहशतवादादी अनुचित प्रकार न घडता सर्व मतदान पार पडले, ही खरेच कौतुकाची बाब. ज्या क्षणाची जम्मू–काश्मीरवासीय गेली दहा वर्षे वाट पाहात होते, तो क्षण सुखेनैव पार पडला. पुढील आठवडयात ८ ऑक्टोबरला मतमोजणी होऊन राजकीय चित्र स्पष्ट होईल. त्यात विजय कोणत्याही पक्षाचा होवो, त्याचे श्रेय त्या अभागी प्रांतातील लोकशाही निष्ठेस मिळायला हवे.

याआधी दहा वर्षांपूर्वी राष्ट्रप्रेमी भाजप आणि राष्ट्रद्रोही मेहबूबा मुफ्ती यांचा ‘पीडीपी’ यांची सत्ता होती. हे पक्ष काही नैसर्गिक सहचर नाहीत. पण त्या वेळच्या निवडणुकीत ८७ सदस्यांच्या विधानसभेत सर्वात मोठया ठरलेल्या ‘पीडीपी’चे फक्त २८ आमदार निवडून आले आणि २५ ठिकाणी विजयी ठरलेला भाजप दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष बनला. बाकीच्या पक्षांस मिळालेल्या जागा नगण्य होत्या. त्यामुळे ‘पीडीपी’चे मुफ्ती मोहम्मद सैद यांनी भाजपसमोर दोस्तीचा हात पुढे केला. ज्या पक्षाच्या देश–निष्ठांविषयी भाजपने इतके दिवस संशय व्यक्त केला होता त्याच पक्षाशी भाजपची आघाडी झाली. भाजपचे निर्मल कुमार सिंग हे उपमुख्यमंत्री बनले. तथापि ते सरकार अल्पजीवी ठरले. नंतर तर तीन वर्षांनी केंद्राने त्या राज्यास विशेष दर्जा देणारे ‘अनुच्छेद ३७०’ रद्द केले गेले आणि त्या राज्याचे दोन तुकडे केले. वास्तविक राज्य फेरआखणी/विभागणी इत्यादींचा ठराव त्या त्या राज्याच्या विधानसभेत व्हावा लागतो. येथे तसे काही झाले नाही. विधानसभा अस्तित्वात नाही असे कारण पुढे करत केंद्राने एकतर्फी निर्णय घेतला आणि जम्मू–काश्मीरपासून लेह–लडाख वेगळे केले. इतकेच नाही तर केंद्राने २०२२ साली राज्यातील मतदारसंघांची पुनर्रचना करून हिंदूबहुल जम्मू परिसरातून अधिक आमदार येतील आणि त्याच वेळी मुसलमानबहुल काश्मीर खोऱ्यातून इतकी वाढ होणार नाही, याची खात्री करून घेतली. त्यानुसार जम्मूतून या विधानसभेत सहा आमदार अधिक येतील तर काश्मिरातून एक. अशा तऱ्हेने विधानसभेची सदस्यसंख्या ९० होऊन तीत जम्मूतील ४३ आणि काश्मिरातील ४७ आमदार असतील. या नव्या आकाराच्या विधानसभेची ही पहिली निवडणूक.या निवडणुकीनंतर जम्मू–काश्मीरसाठी पुढचा टप्पा असेल तो पूर्ण वयात आलेल्या राज्याचा दर्जा मिळणे, हा. तूर्त ते ‘राज्य’ केंद्रशासित आहे आणि नायब राज्यपालांकडून ते हाताळले जात आहे. हे नायब राज्यपाल हे केंद्राच्या हातातील बाहुले, हे नव्याने सांगण्याची गरज नाही. तेव्हा केंद्रास हवे–नको तेच ते करणार, हे उघड आहे. इतके दिवस ते खपून गेले. कारण तेथे लोकनियुक्त सरकारचा अभाव होता. आता तसे नाही. एकूण ९० सदस्यांची विधानसभा आता तेथे भरेल आणि लोकनियुक्त सरकारही त्या प्रांतास मिळेल. तेव्हा केंद्राने आपली लुडबुड थांबवणे इष्ट. त्या राज्यातील जनतेच्या भावभावना या त्यांच्या लोकप्रतिनिधींपेक्षा अन्य कोणास समजून घेता येणार नाहीत. या लोकप्रतिनिधींनी आपापल्या जागा घेतल्यानंतर नायब राज्यपालांनी त्यांस स्वतंत्रपणे कारभार करू द्यावा. त्यासाठी पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावण्याची वेळ त्या राज्यातील नागरिकांवर येऊ नये. निवडणुका घेण्याच्या निरुत्साहावर सर्वोच्च न्यायालय हा उतारा ठरला. जे झाले ते झाले. ‘लोकसत्ता’च्या ‘लोकसंवाद’ कार्यक्रमात बोलताना त्या राज्याचे माजी अर्थमंत्री हसीब द्राबू यांनी एक महत्त्वाचे विधान केले. ‘‘जम्मू–काश्मिरातील वैफल्यग्रस्त तरुणांस निवडणुकांनी हातातले दगड बाजूस ठेवून मतदानात व्यक्त होण्याची संधी दिली’’, हे द्राबू यांचे मत. यानिमित्ताने ‘बुलेट’ (बंदुकीची गोळी)ला ‘बॅलट’ची (मतपत्रिका) ओढ लागत असेल तर त्याचे स्वागत.

# विज्ञान अन् अध्यात्माची सांगड हवी

## शास्त्रज्ञ डॉ.रघुनाथ माशेलकर : एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी तर्फे तत्त्वज्ञान संसद

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

जागतिक शांतता दिवस साजरा करीत असताना दुसरीकडे अनेक देशात युद्धाचे सावट पसरले आहे. अशा युद्धजन्य परिस्थितीतून बाहेर येऊन जगात शांतता नांदावी. यासाठी विज्ञान आणि अध्यात्माची सांगड घालावी लागणार आह. असे विचार ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी व्यक्त केले.



एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीतर्फे विश्वराजबाग, लोणी काळभोर येथे आयोजित जगातील सर्वात मोठ्या शांती घुमटात १० व्या जागतिक विज्ञान, धर्मे/अध्यात्म आणि तत्त्वज्ञान संसदेच्या उद्घाटन प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या प्रसंगी ज्येष्ठ संगणक तज्ज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर, द पॉवर ऑफ वर्ल्डस फाउंडेशनच्या संस्थापक देबोरा सवाफ, डॉ डीनीस क्रॉर्डा, जैन धर्मगुरू आचार्य लोकेश मुनी, प्रा. रूझान पश्चू प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड होते.तसेच, एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, एडीटी युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष डॉ.मंगेश तु. कराड, डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस, संसदेचे मुख्य समन्वयक व प्र कुलगुरू प्रा.डॉ. मिलिंद पाडे उपस्थित होते.डॉ. रघुनाथ माशेलकर म्हणाले, जागतिक शांततेच्या दिनी इराणहून इस्त्राइलवर २०० मिसाईल डागण्यात आले. दुसरीकडे रशिया आणि युक्रेन या दोन देशांमध्ये युद्ध सुरू आहे. अशा परिस्थितीत जागतिक शांतता दिवस कसा साजरा करू शकतो. तसेच उच्च शिक्षणात व्यावसायिक अभ्यासक्रमाला अधिक देण्यात आले आहे. यामध्ये विज्ञान आणि अध्यात्म यांची सांगड घालणे कठीण झाले आहे. अशवेळेस विज्ञान आणि अध्यात्माची सांगड घालून नवी पिढी घडवू शकतो. अध्यात्म हे अनुभवांकर आधारित असून आत्मिक आणि मानसिक शांतता मिळते. वर्तमान काळात दलाई लामा, नेल्सन मंडेला,य मार्टिन ल्युथर किंग, म.गांधी यांच्याकडून प्रेरणा घेण्याची आवश्यकता आहे.डॉ.विजय भटकर म्हणाले, २१ व्या शतकात शांततेने जगू शकू का हा प्रश्न सातत्याने निर्माण झाला आहे. सध्याच्या काळात मशीन आणि मनुष्या अशी जोडी भयानक वाटत आहे. त्यातच कृत्रिम बुद्धिमत्तेचा उदय झाला. त्यामुळे भविष्यात शांततेबाबत चिंता वाटते. डॉ. कराड यांनी जागतिक संसदेच्या माध्यमातून सुरू केलेले प्रयत्न, नक्कीच शांतता प्रस्थापित करण्यासाठी उपयोगी पडणार आहेत.प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, जगात शांतता नांदावी ही आता काळाची गरज आहे. जगाची परिस्थितीकडे आपण पाहिल्यास संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, महात्मा गांधी यांचे विचार अंमलात आणावे. आपल्या विचारातून आळंदी, अयोध्या, अजमेर या शहरांना जोडावे लागणार आहे. त्यासाठी आपल्याला वर्ल्ड पीस डोममध्ये सुरू असलेल्या, संसदेचा नक्कीच फायदा होणार आहे. देबोरा सवाफ म्हणाल्या, शांतता आणि एकात्मिकता प्रस्थापित करणे सर्वांची जवाबदारी आहे. तसेच मुलांना शाळांमधून ’इमोशनल इंटेलिजन्स’ शिकवण्याची गरज आहे. त्याशिवाय आपण प्रगती करू शकणार नाही. संस्कृती, अध्यात्म, विज्ञानाला ’इमोशनल इंटेलिजन्स’, ’इमोशनल कोशंट’ची जोड दिल्यास, आपण उत्कृष्ट युवा पिढी आणि जागतिक नेते नक्कीच घडवू शकू.डॉ. डीनीस क्रॉर्डा म्हणाले, विज्ञान, तंत्रज्ञान, मानवता मूल्ये आणि धर्माच्या माध्यमातून जगात शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत आहे. युद्धाच्या छायेत जगणारे व्यक्तींना आता तंत्रज्ञान आणि अध्यात्माच्या माध्यमातून शांतता प्रस्थापित करण्यावर विचार करावा.

राहुल कराड म्हणाले, विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वक्षमता विकसित करायची आहे. यामध्ये शिक्षण संस्थांची भूमिका महत्त्वाची आहे. आपल्याला वाईट प्रवृत्तींकडून चांगल्याकडे जाण्याचा प्रयत्न अशा संसदेतून करायचा आहे.या नंतर ज्येष्ठ खासदार डॉ. करण सिंह आणि डॉ. टोड क्रिस्तोफरसन यांनी व्हिडिओया माध्यमातून शांतते संदर्भात विचार मांडले. डॉ. आर.एम. चिटणीस यांनी स्वागतपर भाषण केले.

सूत्रसंचालन डॉ. गौतम बापट यांनी केले.

# परळीत विधानसभा ताकदीने लढणार

## शेख शरीफ:निवडणूक वातावरण तापले!

परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी



आगामी विधानसभा निवडणुकीत परळी विधानसभा ऑल इंडिया मजलिस–ए–इतेहादुल मुस्लिमीन अर्थातच एमआयएम पक्ष पूर्ण ताकदीने लढणार आणि परळी शहर व मतदारसंघात शांतता, सुव्यवस्था अवाधित राखण्यासाठी आपण निवडणूक लढविणार अशी घोषणा आज एमआयएम परळी तालुकाध्यक्ष शेख शरीफ भाई यांनी गुरुवारी दिनांक ०२ ऑक्टोबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेतून केली आहे. बीड जिल्ह्यात एमआयएम पक्षाच्या जिल्हाध्यक्ष एडवोकेट शफीक भाऊ यांच्या नेतृत्वाखाली काम करीत आहोत

देशात पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष बॅरिस्टर असदुद्दीन औवेसी अल्पसंख्याक समाजासाठी देशपातळीवर लढत आहे आणि महाराष्ट्रात माजी खासदार आणि पक्षाचे राज्य अध्यक्ष सय्यद इम्तियाज जलील साहेब काम करत आहे त्यांना बघून अनेक जण पक्षाच्या संपर्कात आहेत. एमआयएम पक्ष विधानसभा निवडणुक ताकदीने लढविणार आहे. याचाच एक भाग म्हणून मी स्वतः परळी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविणार असल्याची माहिती परळी तालुका अध्यक्ष शेख शरीफ भाई यांनी दिली. परळी विधानसभा मतदारसंघात एकच घर सलग सत्तेत आहेत तरीही, परळीचा विकास नाही झाला असा वाटत नाही. शहरात शिक्षणाच्या सोयी व रोजगार उपलब्ध नाही. अधिकारी, नौकरदार, व्यापारी, महिला, मुली, विद्यार्थी, अल्पसंख्यांक हे सर्व घटक आज दहशतीखाली जीवन जगत आहेत. शहरातील श्रीमंत, ऐपतदार लोक कुटुंबासह स्थलांतरित झाले आहेत. शेतकरी अनुदान व पीक विम्यापासून वंचित आहेत. परळीत उद्योग, व्यवसाय प्रगतीपथावर नाहीत हे चित्र आता बदलले पाहिजे, नेहमीच परळीकरांच्या आशिर्वादावर केवळ स्वतःच मोठे झालेल्यांना सलग सत्तेत राहून ही परळीचा विकास करता येवू नये ही मोठी शोकांतिका आहे.शहरात विकासाचा नावावर फक्त अर्धवट कामे करून बिल उचलायचे उदा; अल्पसंख्याक वसतिगृह, बुद्ध विहार , शादी खाना, अन्यतरी या सर्व गोष्टी बघुन एमआयएम पक्षाने हे निर्णय घेतला आहे की आपण परळी विधानसभा लढवायची आहे.

# पान एक वरून

### हिंदूंना शिव्या देणाऱ्या भिडला

बिग्रेडचे नेते संतोष शिंदे यांनी संभाजी भिडे यांना त्यांच्या वादग्रस्त वक्तव्याप्रकरणी अटक करण्याची मागणी केली आहे. मनोहर उर्फ संभाजी भिडे हा अत्यंत विकृत माणूस आहे. हिंदू स्त्रिया असो की हिंदू समाज यांच्या विषयी नेहमी वादग्रस्त वक्तव्य करत असतो. समाजा समाजात जातीय आणि धार्मिक तेढ निर्माण करणारा आणि महाराष्ट्रात दंगली घडवणारा मनोहर भिडे महाराष्ट्राला लागलेला कलंक आहे. राज्यात जातीवादी वाईट घटनेचा मास्टरमाईंड आहे. अशा विकृत व्यक्तीला सरकारने पाठीशी घालू नये, असं संभाजी ब्रिगेडचे नेते संतोष शिंदे म्हणाले आहेत.हिंदूंना महामुर्ख आणि गांडू म्हणणाऱ्या मनोहर उर्फ संभाजी भिडे याला तात्काळ अटक करून सरकारने कायदेशीर कडक कारवाई करावी, अशी संभाजी ब्रिगेडची सरकारकडे मागणी आहे. भिडेच्या वक्तव्याला सरकार नेहमी पाठीशी घालत आहे. सरकारने हिंदूंना महामूर्ख म्हणणाऱ्या या वक्तव्याला गप्प बसून पाठिंबा देऊ नये. अन्यथा सरकारची भूमिका महाराष्ट्राच्या लक्षात आल्याशिवाय राहणार नाही. भिडेला तात्काळ आता अटक करा, अशी मागणी संतोष शिंदे यांनी केली आहे.

### शेतकरी महासन्मान योजनांच्या

राज्यातील जवळपास १.२० कोटी शेतकरी कुटुंबांना एकूण १७ हप्त्यांमध्ये सुमारे रू. ३२००० कोटीचा लाभ जमा झालेला आहे.

पी. एम. किसान योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात सन २०२३–२४ पासून नमो शेतकरी महासन्मान योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. पी. एम. किसान योजनेच्या १४ व्या हप्त्यापासून पुढील प्रत्येक हप्ता वितरणावेळी लाभ देण्यात आलेल्या राज्यातील पात्र शेतकरी कुटुंबांना या योजनेचा लाभ अदा करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाने २०२३–२४ व २०२४–२५ या आर्थिक वर्षात एकूण चार हप्त्यांमध्ये एकूण ९१.४५ लाख शेतकरी कुटुंबाना रक्कम रु. ६९४९.६८ कोटी लाभ अदा करण्यात आला आहे. जुन २०२३ पासून आयोजित गावपातळीवरील विशेष मोहिमांद्वारे पी. एम. किसान योजनेच्या लाभासाठी बंधनकारक असलेल्या बाबींची २० लाखाहून अधिक शेतकऱ्यांची पूर्तता झाल्याने देशपातळीवर दुसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्रातील शेतकरी कुटुंबांची संख्या आजरोजी योजनेच्या लाभासाठी पात्र ठरली आहे.केंद्र शासनाच्या पी. एम. किसान योजनेच्या १८ व्या हप्त्याच्या लाभ वितरणावेळी राज्यातील भूमि अभिलेख नोंदी अद्ययावत केलेल्या, बँक खाती आधार संलग्न केलेल्या व ईकेवायसी पूर्ण केलेल्या एकूण ९१.५२ लाख शेतकरी कुटुंबांच्या बँक खात्यात रू. १९०० कोटीहून अधिक रक्कमेचा लाभ तर राज्याच्या योजनेमधून रू. २००० कोटीहून अधिक रक्कमेचा लाभ शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट हस्तांतरणाद्वारे जमा होणार आहे. या समारंभामध्ये पी. एम. किसान योजने अंतर्गत रू. २०००/ तर नमो शेतकरी महासन्मान निधी योजने अंतर्गत रू. २०००/ असा एकुण रू. ४०००/ चा लाभ प्रधानमंत्री महोदयांच्या शुभहस्ते राज्यातील सुमारे ९१.५२ लाख पात्र शेतकरी कुटुंबांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा होईल. पी. एम. किसान योजना व नमो शेतकरी महासन्मान निधीच्या लाभ वितरण समारंभात हींींिः//ाळिपवळरुशललरीीं. पळल.ळप या लिंकआधारे राज्यातील सर्व शेतकरी बांधवांनी सहभागी होण्याचे आवाहन कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे.

### आता अंतरवाली सराटीमधून

त्यांचे नवीन कार्यालय तयार झाले आहे. शुक्रवारी जरांगे पाटील आणि नारायणगडाचे महंत शिवाजी महाराज यांच्या हस्ते त्या कार्यालयाचे उद्घाटन होणार आहे.मनोज जरांगे यांची प्रकृती अजून पूर्ण बरी झाली नाही. छत्रपती संभाजीनगरमध्ये माध्यमांशी बोलताना ते म्हणाले, अजूनही तब्येत बरी नाही. परंतु दसरा मेळावा आहे आणि त्याचे नियोजन करण्यासाठी हॉस्पिटलमधून सुट्टी घेत आहे. दसरा मेळाव्याला येणाऱ्यासाठी बीड जिल्ह्यातील मंगल कार्यालय उघडे ठेवावे. जेणेकरुन दसरा मेळाव्याला येणाऱ्यांची व्यवस्था होईल. राज्यातील मराठयांची इच्छा होती दसरा मेळावा झाला पाहिजे. या मेळाव्याला राज्यभरातून अनेक जण येणार आहेत. दसरा मेळावा आहे पण त्याचे राजकीय अर्थ काढू नका.दसरा मेळाव्याला कोणी राजकारणी म्हणाला जाऊ नका. त्यांनी तुम्हाला अडवले तर त्यांची नावे सांगा. मी सर्व नेत्यांना सांगतो, मराठा समाजातील कार्यकर्त्यांना आडवे पडू नका. नारायणगडवर होणार दसरा मेळावा हा मराठा दसरा मेळावा नाही. या मेळाव्याला अठरा पगड जातीचे लोक येणार आहेत. राज्यातील कानाकोपऱ्यातून लोक दसरा मेळाव्याला येणार आहेत.

### तुरुंगातील जातीभेद हटवू

न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. पत्रकार सुकन्या शांता यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड, न्या. जेबी पारडीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड सदर सुनावणी दरम्यान म्हणाले, स्वातंत्र्याच्या ७५ वर्षात जातीवर आधारित भेदभावासारखी दुष्ट प्रथा आपण संपवू शकलेलो नाहीत. देशातील सर्व नागरिकांना न्याय आणि समानता प्राप्त करून देईल, असे राष्ट्रीय ध्येय आपल्याला डोळ्यासमोर ठेवावे लागेल. संविधान सभेत केलेल्या शेवटच्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या भविष्याबाबत ज्या चिंता व्यक्त केल्या होत्या, त्या आजही खऱ्या ठरत आहते, असेही सर्वोच्च न्यायालयाने यावेळी म्हटले. याचिकाकर्त्या सुकन्या शांता म्हणाल्या की, उत्तर प्रदेश, तमिळनाडू, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल यांच्यासह ११ राज्यातील कारागृहात कैद्यांना त्यांच्या जातीवर आधारित काम दिले जाते. त्यांच्या राहण्याची व्यवस्थाही जातीनुसार ठरते. अनेक राज्यातील कारागृह नियमावलीत जातीवर आधारित भेदभावाचा उल्लेख आहे. जेवण बनविण्याचे काम उच्च जातीमधील कैद्यांना दिले जाते. स्वच्छतेचे काम खालच्या जातीमधील कैद्यांना दिले जाते. तर काही जातींचा गुन्हे करणाऱ्या जाती म्हणून उल्लेख करण्यात आला आहे.

### मराठी भाषेला मिळाला

दरम्यान, काही लोकांना प्रश्न पडला आहे की, एखाद्या भाषेला अभिजात दर्जा मिळाला म्हणजे नेमकं काय झालं? यामुळे काही फायदे मिळणार? आणि अभिजात दर्जा मिळवण्यासाठीचे निकष काय असतात? या सर्व प्रश्नांची उत्तरं आम्ही तुम्हाला देत आहोत.

# पान सहा वरून

### केजमध्ये लॉवाल्यांना खाकीचा

सागर प्रताप लॉजची तपासणी केली. त्यानंतर मध्यरात्री १.४५ ते २.३० वाजेच्या अंबाजोगाई रस्त्यावरील पिसेगाव शिवारातील सुजित लॉज व धारूर रस्त्यावरील तांबवा शिवारातील श्रेया लॉजची झडती घेतली. या तपासणीत पाच लॉजच्या मालक व मॅनेजरने शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन केले नसल्याचे निदर्शनास आले. डीएसबीचे पोलीस कॉन्स्टेबल मतीन शेख यांच्या तक्रारीवरून या पाच लॉजच्या मालक व मॅनेजरक्रुद्धि भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ नुसार गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास जमादार दत्तात्रय बिक्कड व जमादार श्रीकांत चौधरी हे करीत आहेत. अशा प्रकारे केज व तालुक्यात अनेक ठिकाणी सर्रासपणे नियमांचे उलंघन केले जात आहे. त्याच प्रमाणे अवैध धंदे केले जात आहेत. अशा धंदेवाल्यांवरही कारवाई करावी अशी मागणी केज येथील सर्वसामान्य नागरीक करत आहेत.

### नाथ प्रतिष्ठानकडून

अनंत इंगळे, जयपाल लाहोटी, प्रा. शंकर कापसे, रवि मुळे,दै.जगमित्रचे संपादक बालासाहेब कडभाने, अनिरुद्ध जोशी, प्रणव परळीकर,धनराज कुरील, राजकुमार हजारे, सुरेश गित्ते,सुरेश नानवटे,बळीराम नागरगोजे,अमित केंद्रे,चंद्रप्रकाश हालगे, सचिन गुट्टे, पप्पु काळे, दिपक कुरील, युवती अध्यक्षा वर्षा दहिफळे,रेणुका सोळंके, शितल गोरे, पुजा पांडे यांसह आदी उपस्थित होते.

### राख वितरणमध्ये करोडोंचा

टन इतकी होते,या मात्रे साठी एक महिन्या पूर्वी `पश्रळपश इ– ऑक्शन होऊन त्या साठी ६१९ रुपये प्रतिटन इतका उचांक दर आला आहे.मात्र हा उचांक दर येऊन देखील औष्णिक विद्युत केंद्रातील मुख्य अभियंता व अधिकारी यांच्या मनमानी कारभारा मुळे व स्वतःचे खिसे भरण्याच्या हव्यासापोटी लघु उद्योगांना जुन्याच २१० रुपये प्रतिटन भावाने राख दिली जात आहे त्या मुळे औष्णिक विद्युत केंद्राचा ५४०÷ ४०९ (दरातील फरक)असा प्रतिदिन २२०००० इतका महसूल बुडत आहे तरी शासनाच्या नुकसानिस जवाबदार कोण असा प्रश्न नागरिकांतून उपस्थित होत आहे तरी परळी औष्णिक विद्युत केंद्रातील भ्रष्टाचार कधी थांबणार असा सवाल सर्वसामान्य जनतेतून उपस्थित केला जात आहे.

### परळी तहसीलदार गरिबांच्या

करून ती गरजवंतांना वितरित करण्यासाठी वेळोवेळी तहसील प्रशासन उपविभागीय अधिकारी व परळी पंचायत समितीकडून पत्रव्यवहार करण्यात आला आहे परंतु हा पत्रव्यवहार सगळा वेळखाऊपणाचे लक्षण असून प्रत्यक्ष कृती मात्र शून्य असल्यामुळे घरकुल लाभार्थ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे तसेच पालकमंत्री तथा कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी या सदर गंभीर बावीकडे लक्ष घालून परळी तालुक्यातील गोरगरीब गरजूवंत लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करून देण्यासाठी तहसील प्रशासनाला सूचना करून आदेशित करण्यात यावे. अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांनी केली आहे. पालकमंत्री साहेब तुमचा तहसीलदार गोरगरीब घरकुल लाभार्थ्यांना वाळू देण्यासाठी जाणीवपूर्वक टाळाटाळ करतो आहे त्यांना वेळीच आवर घाला अशी संतप्त प्रतिक्रिया आहे त्यांनी यावेळी व्यक्त केले आहे.गोरगरीब घरकुल लाभार्थ्यांच्या भावनेशी खेळणाऱ्या प्रशासनाने वेळीच याची दखल घेऊन गरजू घरकुल लाभार्थ्यांना तात्काळ वाळू वाटप करण्यात यावी अन्यथा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने गोरगरीब घरकुल लाभार्थ्यांना न्याय मिळण्यासाठी तीव्र स्वरूपाची आंदोलन करण्याचा इशाराही वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांनी दिला आहे.

### बीडमध्ये मंत्री रामदास आठवलेंचा

संख्येने सामील होऊन विराट शक्ती प्रदर्शन करावे. असे आवाहन रिपाइंचे ज्येष्ठ नेते दयानंद उजगरे, विष्णू जोगदंड, महेंद्र वडमारे, दीपक जोगदंड, भास्कर वडमारे,सोनू वडमारे, दीपक ओव्हाळ, प्रकाश गायकवाड यांनी केले आहे.

### सोयगाव महाराष्ट्र बँकेचे

खेड्यापाड्यावरील ग्राहक बँकेच्या समोर येऊन थांबले होते, त्यात अनेक महिलांकडे असणारी लहान मुले, जेष्ठ नागरिक यासारख्याचा समावेश असतो. मात्र सकाळपासून रांगेत उभे राहिलेल्या लोकांना आज बँकेचे सर्व्हर बंद असल्याने निराश होऊन घरी परतावे लागले. सर्व्हर बंद पडण्याच्या . तसेच अन्य तांत्रिक कारणाने बँकेचे व्यवहार कायम ठप्प होत असल्याने याचा त्रास नेहमीच ग्राहकांना सहन करावा लागतोय बॅक प्रशासनाने वेळीच लक्ष घालून पर्यायी नेटवर्कची व्यवस्था करावी अशी ग्राहकांकडून होत आहे.

### रोटरीच्या कार्यात सहभागी

यावेळी त्यांनी जगभरात रोटरी द्वारे राबविण्यात येणाऱ्या प्रमुख उपक्रमाची सविस्तर माहिती दिली. केज रोटरीच्या आजपर्यंतच्या कार्याची त्यांनी प्रसंशा केली. केजवासीयांनी जगभरात कार्य करणाऱ्या रोटरी मध्ये स्वयंस्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन केले. यावर्षीच्या केज रोटरी ’नेशन बिल्डर अवॉर्ड २०२४’ चे मानकरी ,संदेश अंबादास फावडे ,अशोक अनंतराव जोगदंड ,मुल्ला समद बशीर साब ,अनंत नानाभाऊ जाधवर ,श्रीकृष्ण लक्ष्मणराव सिरसट ,प्रशांत लक्ष्मणराव जाधव , गीता जीवराज अंडिल वैशाली शंकरराव धाडवे, वैशाली कारभारी बोराडे,स्वाती वामनराव समुद्रे हे ठरले.पुरस्कार प्राप्त शिक्षक–शिक्षकांच्या वतीने गीताताई अंडील व संदेश फावडे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी त्यांनी रोटरीचे पुरस्कार खूपच प्रेरणादायी असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हनुमंत भोसले यांनी केले तर आभार सचिव अनंत तरकसबंद यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी कण्यासाठी रो विकास मिरगणे, प्रवीण देशपांडे, सूर्यकांत चवरे, अरुण अंजाण, बापूराव सिंगण, प्रा डॉ बीजे हिरवे, श्रीराम देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

### धम्मभुमी ते दिक्षाभुमी

घेऊन स्वाभिमानाचा नारा दिला होता मनुन हरेगाव ला स्वाभिमानी धम्मभुमी मनुन ओळखले जाते धम्मभूमी ते दीक्षाभूमी नागपूर जागृती अभियान तथागत बुद्धिस्ट सोसायटी इंडिया अहमदनगर जिल्ह्याच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे

### बीड झोनमध्ये मुलींच्या

या मुलीने आपली उत्कृष्ठ कौशल्याचे सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या मुलींच्या संघास क्रीडा संचालक, डॉ ए डी टेकाळे, शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख, डॉ विठ्ठल भोसले, प्रा. दयानंद झिंजूर्डे यांचे मार्गदर्शन लाभले.मुलींच्या या यशाबद्दल संस्थाध्यक्ष, मा. आ. व्यंकटराव कदम साहेब, सचिव, योगेश भैय्या कदम, संस्थेचे सर्व संचालक, प्राचार्य डॉ के के पाटिल, डॉ ए डी टेकाळे, डॉ विठ्ठल भोसले, प्रा. दयानंद झिंजूर्डे आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व शूभेच्छा दिल्या आहेत.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अ‍ॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# मतदार संघात विकास गंगा वाहतेय!

## शिवराज पवार | रस्ता कांमाचा शुभारंभ

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

विविध योजनेंतर्गत निधी उपलब्ध करून आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी मतदारसंघात विकासाची गंगा आणुन गेवराई मतदारसंघातील गाव वाडी वस्ती पर्यंत विकास काय असतो ते दाखवुन दिले आहे तसेच जनेतेच्या अडचणी कमी करण्यासाठी आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी प्रमाणिक प्रयत्न केले आहे त्यामुळेच मतदारसंघाचा विकास झालेला आसल्याचे युवानेते शिवराज पवार यानी उद्घाटन प्रसंगी बोलतांना म्हटले आहे

.मतदारसंघातील मादळमोही ते शहाजनपुर पुर, तसेच खडकी ते मनकापुर, येथे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रस्ता कामांचे आज दि.३ ऑक्टोबररोजी शिवराज पवार यांच्या हास्ते उद्घाटन करण्यात आले यावेळी अनिल काका पौळ,सतीश दाभाडे,उकड पिंपरी सरपंच गहिनीनाथ पालवे, पोखरी चे सरपंच अमोल मोघे,पवन भैया गावडे, सरपंच अमोल मोघे, सरपंच रितेश साबळे,सुशीलजी भोपळे, संदीप आंधळे,सतीश थोरात,तांदळा सरपंच नवनाथ गवते,तळेकर शहाजानपूरचे सरपंच संदीप



सोलंकर जिजा,तुकाराम माखले,मच्छिंद्र यादव, अशोक भाऊ हराळे,संतोष करांडे,बालाजी कंट्रक्शन चे सुनील भाऊ घाटूळ,इंजि. सचिन वीर सर,इंजि.नवले साहेब सचिन,समाधान जिजा मस्के,मुन्नाभाई मोटे, संतोष भोसले, गोरख मोटे, कृष्णा भाऊ पाटोळे, विक्रम भोसले ,संतोष कारंडे, अशोक मामा घोलप, ग्रामपंचायत चे सदस्य संतोष थोरात,संदीप उघडे,भास्कर सानप, साईनाथ उघडे, संकेत मदने,हनुमान मदने,प्रकाश काशीद,पपु सानप, प्रकाश दराडे,संदीप सोनकर संरपंच,रघु घाडगे,संतराम वल्हेकर,आबादास हजारे,बाबुराव जेठे,रामा घुगे,हजारे रामभाऊ,तेजश हराळे,विठ्ठल बरकडे,यशराज हराळे,नामदेव बरकडे,आसाराम बगाळ,शामराव धुगे,संतोष हजारे,कचरा हजारे,लक्ष्मण घाडगे,आशोक पवळ, शेख पाशा, जेठे,बाकु हराळे,संतोष धाडे,,आबादास दराडे,गोविद यमगर,महादेव जगताप,तुकाराम पवळ,रंजीत शिंदे,लक्ष्मण सोलनकर,मनोहट सोलनकर,लक्ष्मण दराडे,शिवाजी उमाप, हनुमान महाराज,नवनाथ कौठेकर,भाऊसाहेब कौठेकर, सूर्यकांत कोठेकर, लक्ष्मण कौठेकर, नारायण कौठेकर,आसाराम कौटेकर इत्यादी उपस्थित होते.

## तक्रार निवारण समितीची बैठक घ्या

**निवेदन:** कंपनी विरुद्ध कारवाई करण्याची मागणी



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव तालुक्यात खरिप हंगाम २०२३ मध्ये गंभीर दुष्काळ जाहीर झालेला असतांना पीकविमा कंपनी ने बाधित शेतकऱ्यांना पीकविमा वितरणाची रक्कम कमी स्वरूपात दिली असल्याचा थेट कंपनी वर आरोप करत तातडीने तालुका तक्रार निवारण समिती ची बैठक लावण्यात यावी व या गैरप्रकारांची चौकशी करावी अशा मागणीचे निवेदन गुरुवारी सायंकाळी चार वाजता तालुक्यातील शेतकऱ्यांनी तहसीलदार मनीषा मेने जोगदंड यांना दिले

सोयगाव तालुक्यात खरिप हंगाम २०२३ मध्ये गंभीर दुष्काळ असूनही पीकविमा कंपनीने विम्याच्या रक्कम देण्यासाठी हात आखडता घेत हेक्टरी पाच ते सहा हजार रु याप्रमाणे पिकविम्या ची रक्कम शेतकऱ्यांना खात्यात वर्ग केली आहे यामध्ये काही शेतकऱ्यांना कमी तर काही शेतकऱ्यांना जास्त या प्रमाणात पिकविम्या ची रक्कम दिली यामध्ये खूप व्हेरिअशन असून इ पिकपाहणी केलेल्या शेतकऱ्यांच्या ७२ तासांच्या केलेल्या तक्रारी फेटाळून लावत या शेतकऱ्यांना पिकविम्या पासून वंचीत ठेवले आहे या प्रकाराची चौकशी करण्यासाठी तातडीने तालुका तालुका तक्रार निवारण समिती ची बैठक घ्यावी व पूर्ण विमा खात्यात वर्ग करावा अशी मागणी केली आहे निवेदनावर दिलीप पाटील, कृषिभूषण रविंद्र पाटील,श्रीराम नारायण पाटील, श्रीराम तुकाराम पाटील, नरेंद्र पाटील,डॉ अविनाश पाटील,दिलीप महाजन, गोपाळ पाटील राजेंद्र पाटील प्रणव पाटील,विनोद सुरेश पाटील राजू पाटील आर्दीसह तीनशे शेतकऱ्यांच्या स्वाक्षरी आहे

# कृषिमंत्री म्हणजे नाव मोठं अन् लक्षण खोटं

**सुनिल गुट्टे:** ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडल



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने परळी विधानसभा मतदारसंघात संवाद यात्रेला चौथ्या दिवशी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून आणि गावांना भेटी देऊन नागरिकाशी थेट संवाद साधून या यात्रेचे मार्गक्रम करत असताना अतिवृष्टीने शेतक–यांच्या पिकाचे प्रचंड नुकतीच झाल्याचे विदारक चित्र समोर येत आहे. त्यात सरकारकडून मदतीची घोषणा करते पण मदत मिळत नसल्यामुळे शेतकरी हैराण दिसतो आहे. राज्याचे कृषिमंत्री हे बीडचेच असले तरी नाव मोठं आणि लक्षण खोटं या मनी प्रमाणे काम करत असुन ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले कसल्याचा आरोप युवक नेते सुनील गुट्टे यांनी यावेळी केला आहे.

आज चौथ्या दिवशी ही शेतकरी संवाद यात्रा पांगरी, लिंबोटा ,टाकळी देशमुख, कौठळी, बेलंबा ,वागबेट, संगम, सेलु परळी ,लोणी, आणि वडगाव दादाहरी येथे मुक्कामी पोहोचली. वरील सर्व गावातील शेतकरी सर्वसामान्य लोकांशी संवाद साधत अडीअडचणी जाणून घेतल्या ही शेतकरी संवाद यात्रा ज्यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे अशा सौ सुदामतीताई गुट्टे,ज्यांच्या नेतृत्वाखाली होत आहे असे युवक नेते सुनील भैया गुट्टे , तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज शेतकरी नेते कालिदास दादा अपडेट, विधानसभा अध्यक्ष किरण काका पवार, तालुका कार्याध्यक्ष रमेश ढाकणे, उपाध्यक्ष महारुद्र कदम, तालुका सरचिटणीस राजेभाऊ फड,तालुका सरचिटणीस ज्ञानेश्वर शिंदे युवक तालुका उपाध्यक्ष गोविंद देशमुख, युवक तालुका संघटक नंदकुमार दोडके, युवक नेते ईश्वर जिजा सोनवणे किसान सेल तालुका उपाध्यक्ष बबनराव शिंदे,विश्वनाथ मुंडे ,नारायण दिवटे, गोपाळराव शिंगाडे ,भालचंद गुंजकर, अर्जुन आदाटे, छत्रगुण लांडगे, गोविंद शिंदे, गोविंद शिंदे बाळू भाऊ शिंदे रामेश्वर सोनवणे ,विष्णुपंत सोनवणे, यासह पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# अतिवृष्टीतून बागायती क्षेत्र वगळले

**दिलासा :** शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मिळणार मदत

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सप्टेंबरमध्ये झालेल्या दि .०१ ते ०३ आणि दि .२६ ते २७ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसानीचे १९,हजार ४८९ हेक्टरवरील पंचनामे करून नुकसानीपोटी २६,कोटी ५० लाख रु निधीची मागणी गुरुवारी तालुका आपत्ती निवारण विभागाने जिल्हाधिकारी कार्यालयात पाठविली आहे त्यामुळे सोयगाव तालुक्यातील ३२ हजार ९८८ बाधित शेतकऱ्यांना दिवाळी पूर्वी ही नुकसानीची रक्कम थेट खात्यात वर्ग होण्याची शक्यता आहे परंतु अतिवृष्टी च्या नुकसानीतुन सोयगाव तालुक्यातील बागायती क्षेत्र वगळण्यात आल्याने हेक्टरी १३ हजार



६०० रु प्रमाणे जिरायती साठी ही नुकसानीची रक्कम मिळणार आहे

सोयगाव तालुक्यात सप्टेंबरच्या पहिल्या व शेवटच्या आठवड्यात असे दोन वेळा अतिवृष्टी खाली यामध्ये पहिल्या अतिवृष्टीमुळे ७२ गावातील १५ हजार ७५७ हेक्टरवर नुकसान झाल्याचा अहवाल पाठविला तर सप्टेंबर च्या शेवटच्या आठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे उर्वरित ११ गावातील झालेल्या ३ हजार ७३२ हेक्टरवर नुकसानीचा अहवालासह एकत्रित १९ हजार ४८९ हेक्टर साठी प्रति हेक्टरी १३ हजार ६०० रु प्रमाणे २६ कोटी पन्नास लाख ५२ हजार इतक्या निधीची तातडीने गुरुवारी मागणी पाठविण्यात आली आहे दरम्यान दिवाळी पूर्वी ही नुकसानीची रक्कम बाधित शेतकऱ्यांना खात्यात मिळणार असल्याची शक्यता असून मात्र आगामी विधानसभा निवडणुकीची आचार संहिता लागू झाल्यास मदतीचा प्रश्न अवघड होण्याची चिन्हे दिसून येत आहे.

> सोयगाव तालुक्यात दोनवेळा झालेल्या अतिवृष्टी च्या नुकसानीमधून बागायती आणि फळबागा क्षेत्राची वगळणी करण्यात आली आहे त्यामुळे केवळ जिरायती क्षेत्रातील पिकांनाच हेक्टरी तेरा हजार सहाशे रु प्रमाणे मदत मिळणार आहे.

**नुकसान झालेली पिकं**

कापूस :१४ हजार हेक्टर
मका:१९०० हेक्टर
सोयाबीन :२२०० हेक्टर
आणि उर्वरित क्षेत्रात इतर पिके बाधित आहेत.

# लिटिल बडस स्कूलचे विद्यार्थी सन्मानित

**नियोजन:** नगर जिल्ह्याला मराठा पतसंस्थाचा उपक्रम



नेवासा/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठा सेवा संघ प्रणित अहमदनगर जिल्हा मराठा पतसंस्थाचा वतीने वर्धापनदिन गुणगौरव व स्नेहमेळावा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या वेळी देवदया शैक्षणिक बहुउद्देशीय ग्रामविकास प्रतिष्ठान संचलित लिटिल बडस स्कूलचे विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.

शाळेचे विद्यार्थी प्रताप शिंदे विराज केदार गोकुळ कापरे प्रेम जाधव विकास कुशवाह विघ्नेश करंजकर दीप नांदणकर समृद्धी शिरसाट ईश्वरी चतुर यांना प्रमुख पाहुणे जिल्हा अधीक्षक सुधाकर बोराळे व मराठा पतसंस्थांचे संस्थापक अध्यक्ष इजि विजयकुमार ठुबे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी शाळेचे मार्गदर्शक सुशांत मुसळे बाबासाहेब गव्हाणे सौ बर्वे मॅडम सौ कसबे मॅडम सौ फाजगे मॅडम सो वंजारे आदी शिक्षक वृंद उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजक अहमदनगर जिल्हा मराठा पतसंस्थांचे संभाजी मते रावसाहेब घुमरे शिवाजी मरकड आदी नी प्रयत्न केले.

# स्व केशरकाकूंच्या पुण्यतिथी निमित्त कीर्तन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी



लोकनेत्या स्वर्गीय खासदार केशर काकू क्षीरसागर यांची आज दि ४ ऑक्टोबर रोजी १८ वी पुण्यतिथी असून या निमित्त प्रसिद्ध कीर्तनकार ह भ प समाधान महाराज शर्मा यांचे सुश्राव्य कीर्तन आयोजित करण्यात आले असून तत्पूर्वी स्वर्गीय काकूंना आदरांजली वाहण्याचा कार्यक्रम समाधी स्थळी होणार आहे

नगर बीड परळी रेल्वे मार्गाच्या शिल्पकार जिल्ह्याच्या लाडक्या लोकनेत्या स्वर्गीय केशर काकू क्षीरसागर यांची आज दिनांक ४ ऑक्टोबर २०२४ रोजी १८ वी पुण्यतिथी असून या दिवशी सकाळी दहा वाजता स्व काकूंच्या समाधीला आदरांजली वाहण्यात येणार आहे,माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर आणि क्षीरसागर कुटुंबीय तसेच काकूंच्या चाहत्यांच्या वतीने आदरांजलीचा कार्यक्रम झाल्यानंतर प्रसिद्ध कीर्तनकार समाधान महाराज शर्मा यांच्या सुस्राव्य कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे, सकाळी ११ वाजता कीर्तनाला सुरुवात होणार असून स्व काकूंच्या चाहत्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन काकू नाना प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आले आहेतसेच होमिओपॅथी महाविद्यालयाच्या वतीने निरंतर व्हेबिनार सिरीजचे आयोजन केले असून सकाळी राष्ट्रीय होमिओपॅथी आयोगाचे सभापती डॉ अनिल खुराणा यांचे हस्ते सकाळी ९.३० वाजता दूर दृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून उद्घाटन होणार आहे, डॉ उतरेश्वर पाचेगावकर हे पहिले पुष्प गुंफनार आहे, ऍक्युट ऍलिमेंट वर होमिओपॅथी उपचार यावर ते भाष्य करणार आहेत.

## सतीश दाभाडे | सेवानिवृत्ती सत्कार समारंभ

# होमगार्डांनी मोरेंचा आदर्श घ्यावा

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

पोलिसांच्या खांद्याला खांदा लावून काम करणारे व्यक्तिमत्व म्हणजे होमगार्ड. परमनंट नसले तरीही गुन्हेगारांचा रोष स्वतःवर ओढावुन घेण्याची धमक ठेवणारे ही होमगार्ड. असेच गेवराई पोलीस स्टेशन मधील व सर्व पोलीस कर्मचारी अधिकारी व नागरीकांच्या परिचयातील होमगार्ड कैलास बबनराव मोरे हे होमगार्ड खात्यातून सेवानिवृत्त झाले. होमगार्ड पदी कार्य करताना त्यांची ओळख सर्व दूर मोरे मामा म्हणून उमटली. परीक्षा बंदोबस्त, गणपती, नवरात्र, पेट्रोलिंग, होळी जिथे ड्युटी मिळाली तिथे कार्यावर हजर असणारे मोरे मामा. सर्व सहकाऱ्यांसोबत काम करत करत सेवानिवृत्त झाल्यावर मोरे मामांना आनंद अश्रू अनावर झाले होते. होमगार्ड खात्याचे तालुका समादेशक सतीश दादा दाभाडे यांनी कैलास मोरे यांचा सेवानिवृत्त झाल्याबद्दल सत्कार समारंभ आयोजित केला होता. त्या समारंभात होमगार्ड , मित्रपरिवार व हितचिंतक सहभागी झाले होते. सत्कार समारंभ प्रसंगी बोलताना



> घरची परिस्थिती खूप हालाखीची होती. त्यात नशिबाने होमगार्ड म्हणून काम करण्याची संधी मिळाली. पाच भावंडांची जिम्मेदारी, आई – वडील अशिक्षित या सर्व गोष्टींची जाण ठेवून २२ रुपये रोजाप्रमाणे ड्युटीला सुरुवात केली. आजच्या काळात २२ रुपये लहान लेकराच्या चॉकलेटलाही पुरेसे नाहीत परंतु तेव्हा मी या रुपयांमध्ये माझं घर चालवायचो. मी होमगार्ड झालो व कार्यकाळ संपेपर्यंत नोकरी केली याचा मला अभिमान वाटतो.
>
> कैलास बबनराव मोरे , सेवानिवृत्त होमगार्ड

सतीश दादा म्हणाले की आपले काम नेहमीच प्रामाणिकपणे करून, दिलेली जबाबदारी समाज हिताची असावी असा कायमच मनाशी मानस बाळगून ड्युटी करून कोणावरही अन्याय न करता कायद्याच्या चौकटीत राहून सर्वसामान्यांचे कायमच संरक्षणासाठी आपल्या खाकीचा उपयोग करणारे कर्तव्यदक्ष होमगार्ड म्हणून ज्यांनी आपली ड्युटी प्रामाणिकपणे केली असे शिस्तप्रिय तसेच वेळप्रसंगी कठोर भूमिका घेऊन सर्वसामान्यावर जर अन्याय झाला तर त्याला न्याय मिळवून देण्यासाठी कठोर भूमिका बजावणारे मोरे मामा यांचा सर्व नवीन होमगार्डने आदर्श घेऊन समाजाच्या संरक्षणासाठी आपल्या ड्युटीचा उपयोग करावा असे गौरव उदगार होमगार्ड तालुका समादेशक सतिश दाभाडे यांनी मोरे यांच्या सेवानिवृत्त कार्यक्रमा दरम्यान बोलत असताना केले. माझ्या कार्यकाळात मला कैलास मोरे यांच्यासारखे होमगार्ड मिळाले याचा मला अभिमान वाटतो तसेच नवीन तरुण होमगार्डने मोरे यांचा आदर्श घेण्याची आवश्यकता आहे. पुढे बोलताना सतीश दादा म्हणाले की मी होमगार्डना कधीच कर्मचारी म्हणून पाहत नाही ते माझ्या फॅमिली मेंबर्स असल्याप्रमाणे मी समजतो. मोरेंनी खात्याशी एकनिष्ठ राहून कार्यकाळ संपेपर्यंत इमानदारीने कसलीही तक्रार न येऊ देता कार्य बजावले या गोष्टीचा खूप आनंद वाटतो. मोरे सेवानिवृत्त झाले असले तरीही ते आयुष्यभर माझे सहकारी मित्र राहतील असेही सतीश दादा सत्कार समारंभा प्रसंगी बोलले. या सत्कार समारंभामध्ये चोरगे साहेब, ज्ञानेश्वर सपकाळ, पाचंगे साहेब, वारे साहेब, आतकरे साहेब, हातागळे साहेब, केंदळे साहेब, सूर्यवंशी साहेब, हुलगे, सुतार, ढोबळे, सावंत ताई, घुंगासे ताई, तसेच रमेश हातमोडे यांच्यासह मित्रपरिवार व शुभचिंतकांनी उपस्थित राहून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# बीडमध्ये होममिनिस्टर स्पर्धेला प्रतिसाद



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

नवरात्र दुर्गेची नऊ रुपे समाजात वेगवेगळ्या संदेश देणारी असतात. या दुर्गारूपी माता भगिनींनी जयदत्त आण्णांच्या पाठीशी उभे राहावे आणि त्यांना येणार्या विधानसभा निवडणुकीत भरघोस मताने निवडून द्यावे असे प्रतिपादन विजयाताई महिंद्रे यांनी केले. त्या प्रभाग क्रमांक २२ व २६ जुनी सरस्वती शाळा प्रांगणात काकू–नाना प्रतिष्ठान बीड आयोजित जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी २०२४ खेळ पैठणीचा या कार्यक्रमाच्या सोळाव्या प्रयोगाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर सौ.सुनिता ताई उत्तमराव पवार, सौ.कविता प्रमोद शिंदे, सौ.कीर्तीताई पांगारकर साळुंके, सौ.भारती ताई राजेश क्षीरसागर, शिरूर पंचायत समितीच्या माजी सभापती सौ.उषाताई सरवदे, सौ.अर्चनाताई पांगारकर, सौ. कस्तुरी हर्षद वडमारे, सौ. दीक्षाताई कपिल सोनवणे, सौ. सुशीलाताई नाईकवाडे, सौ.रंजना दहिफळे, सौ.सुनीता अस्वले, सौ. पुनम वैभव जोगदंड, सौ.विद्या नानाभाऊ हजारे, सौ.बहिर मॅडम, सौ.माधुरी सुरवसे, सौ.मोनिका सुरवसे, सौ.उषाताई खंडागळे, सौ.सोनलताई अनवणे, सौ.ऐश्वर्या खंडागळे, सौ.सारिका आदमाने, योगा क्लासेसच्या सौ.ठोंबरे ताई यांची प्रमुख उपस्थिती होती.

**सुविचार** - अचूकता पाहिजे असेल, तर सराव महत्त्वाचा आहे.

# युद्धाचा भडका उडणार.......?

गेल्या ७ ऑक्टोबरला हमासने इस्त्राईलवर हल्ला केल्यानंतर मध्य पूर्वेत सुरू झालेला संघर्ष आता कदाचित वेगळ्या आणि निर्णायक टप्प्यावर पोहोचल्याचे दिसते. हमासच्या हल्ल्यानंतर इस्त्राएलने प्रत्युत्तरात गाझा पट्टीवर कारवाई सुरू केली, ही कारवाई अजूनही सुरूच आहे. या दरम्यान इस्त्राएलला हमास, येमेनमधील हुथी आणि लेबनॉन स्थित हेजबुल्ला या संघटनांकडून प्रतिकार होत होता. या सगळ्या संघटनांना इराणचा सर्वतोपरी पाठिंबा आणि सक्रिय मदत मिळत असली तरी आतापर्यंत इराण थेट या संघर्षात उतरलेला नव्हता; परंतु इजरायलने हिजबुल प्रमुखाला ठार केल्यानंतर परिस्थिती बदललेली दिसते. हिजबुल प्रमुखाची हत्या इराणसाठी केवळ धक्कादायक नव्हे तर एक मोठे आव्हानदेखील होती. त्यामुळे इस्त्राएलला ठोस संदेश देण्यासाठी इराणला काही तरी करणे भाग होते. इराणच्या पाठिंब्यावर लढणाऱ्या तिन्ही संघटना इस्त्राएलच्या सातत्याने सुरू असलेल्या हल्ल्यामुळे गलितगात्र झालेल्या असताना या संघटनांचे मनोधैर्य वाढवण्याबरोबरच इस्त्राएललाही परिणामांची जाणीव करून देणे भाग होते. याच कारणांमुळे इराणने इस्त्राएलवर क्षेपणास्त्र हल्ला चढविला असावा; परंतु इराणच्या या कृतीमुळे मध्य पूर्वेत युद्धाचा भडका उडण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. मंगळवारी रात्री इराणने इस्त्राएलच्या दिशेने शेकडो क्षेपणास्त्रे डागली. इराणचे काही क्षेपणास्त्रे मध्य व दक्षिण इस्त्राएलमध्ये पडली, इतर क्षेपणास्त्रे रोखण्यात इस्त्राएलला यश आले. इराणच्या या कृतीवर प्रत्युत्तर देताना इस्त्राएलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी इराणने खूप मोठी चूक केली आहे आणि त्यांना याचा परिणाम भोगावा लागेल, असे म्हटले आहे. त्यामुळे आता इस्त्राएल इराणवर परतून हल्ला करणार हे निश्चित आहे. या युद्धाचा भडका उडालाच तर ते अतिशय विनाशकारी असण्याची भीती संपूर्ण जगाला वाटत आहे. इराणकडे क्षेपणास्त्रांचे प्रचंड भांडार आहे. इराणकडे बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि ड्रोनचे सर्वात मोठे शस्त्रागार आहे. त्यात क्रूझ क्षेपणास्त्रे, जहाजविरोधी क्षेपणास्त्रे, तसेच दोन हजार किलोमीटरपर्यंत जाणाऱ्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांचा समावेश आहे. त्यांच्याकडे इस्त्राएलसह कोणत्याही लक्ष्यावर मारा करण्याची क्षमता आहे. इराणचे ड्रोन रशिया-युक्रेन युद्धामध्ये वापरले गेले आहेत आणि सुदानमधील संघर्षातही हे ड्रोन दिसून आले आहेत. इराणी सशस्त्र दल हे पश्चिम आशिया प्रदेशातील सर्वात मोठे सैन्यदल आहेत. त्यात किमान ५ लाख ८० हजार सक्रिय सैनिक, सुमारे दोन लाख प्रशिक्षित सैनिक आहेत. त्या तुलनेत इस्त्राएलकडे सैन्यबळ कमी आहे.

इस्त्राएलच्या नौदल आणि निमलष्करी दलात एकूण १,६९,५०० सक्रिय लष्करी कर्मचारी आहेत. आणखी ४,६५,००० सैनिक राखीव दलात आहेत, तर आठ हजार सैनिक निमलष्करी दलाचा भाग आहेत; परंतु इजरायलचा संरक्षणावरील खर्च इराणच्या तुलनेत जवळपास तिप्पट आहे. इस्त्राएलचे संरक्षण बजेट २४ अब्ज डॉलर्स आहे; तर इराणचे ९.९५ अब्ज डॉलर्स आहे. इस्त्राएलकडे इराणपेक्षा जास्त हवाई ताकद आहे. इस्त्राएलकडे एकूण ६२१ विमाने आहेत; तर इराणकडे ५५१ विमाने आहेत. शिवाय इस्त्राएलच्या हवाई दलात इ-१५, इ-१६ व इ-३५ सारखी अत्याधुनिक लढाऊ विमाने आहेत. सोबतच इस्त्राएलकडे त्यांची प्रसिद्ध बहुस्तरीय हवाई संरक्षण प्रणालीदेखील आहे. ज्यामध्ये आयर्न डोम, डेव्हिड्स स्लिंग, ऍरो तसेच द पॅट्रियट यांचा समावेश आहे. असे असले तरी इराणचे आव्हान नक्कीच खूप मोठे आहे. इराणची लष्करीदृष्ट्या सर्वात मोठी ताकद म्हणजे त्यांची लष्करी यंत्रणा. या ताकदीमुळेच खरे तर इराणचे प्रमुख शत्रू असलेल्या अमेरिका आणि इस्त्राएल यांनी अनेक दशकांपासून इराणवर थेट लष्करी हल्ले टाळले आहेत. इराणविरुद्ध कोणतेही युद्ध हे अत्यंत गंभीर युद्ध आहे याची त्यांना जाणीव आहे. शिवाय इराण संपूर्ण पश्चिम आशियातील दहशतवादी संघटनांना शस्त्रे पुरवतो, प्रशिक्षित करतो आणि समर्थन देतो. त्यामध्ये लेबनॉनमधील हिजबुल, येमेनमधील हुथी, सीरिया व इराकमधील गट आणि गाझामधील हमास व पॅलेस्टिनी इस्लामिक जिहाद यांचा समावेश आहे. त्यांना इराणच्या सशस्त्र दलाचा भाग म्हणून गणले जात नसले तरी ते युद्धासाठी सज्ज आहेत, शस्त्रसज्ज आहेत आणि इराणशी अत्यंत निष्ठावान आहेत. इराणवर हल्ला झाल्यास ते इराणच्या मदतीलाही येऊ शकतील; परंतु इराण आणि इजरायल यांच्यात युद्धाचा भडका उडालाच तर अमेरिका या युद्धात ठामपणे इस्त्राएलच्या बाजूने उतरणार हे नक्की. अमेरिका या युद्धात उतरली तर रशिया आणि चीनदेखील तटस्थ राहण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे हळूहळू हे युद्ध जागतिक युद्धात परावर्तीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# सल्लागारच मैदानात.......!

अलीकडील काळात आपल्याकडच्या निवडणुका आधुनिक रुपडे घेत असल्याचे दिसते. त्यामुळे परंपरागत प्रचार यंत्रणेसोबतच काही आधुनिक विचारांचाही प्रादुर्भाव निवडणुकीत झालेला दिसतो. त्यापैकी एक महत्त्वाचा घटक म्हणजे निवडणूक रणनीती सल्लागार. अगदी व्यावसायिक पद्धतीने हे लोक आणि त्यांची चमू काम करीत असते. राजकीय पक्षाचे प्रमुख नेते आपल्या इतर सहकारी नेत्यांपेक्षा या सल्लागारांच्या मतावरच अधिक विसंबून असतात. आता अनेक सल्लागार या क्षेत्रात काम करत आहेत परंतु पहिल्यांदा मोठ्या प्रमाणात चर्चा झाली होती ती प्रशांत किशोर यांची. प्रशांत किशोर यांनी २०१४ च्या निवडणुकीत भाजपचे सल्लागार म्हणून काम केले होते आणि त्यांच्या रणनीतीला त्यावेळी अभूतपूर्व यश मिळाले. पुढे त्यांनी बिहारमध्ये नितीशकुमार यांच्यासाठी तसेच पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्यासाठीसुद्धा काम केले आणि तिथेही ते यशस्वी ठरले. आपला सल्ला आणि मार्गदर्शन इतरांना यश मिळवून देत असेल तर आपणच स्वतः राजकारणाच्या क्षेत्रात का उतरू नये हा विचार त्यांच्या मनात येणे तसेच स्वाभाविक होते. त्यानुसार त्यांनी वाटचाल सुरू केली. मूळचे बिहारचे असलेल्या प्रशांत किशोर यांनी बिहारमध्ये चंपारण येथून अडीच वर्षांपूर्वी तीन हजार किमीची 'पदयात्रा' सुरू केली होती. राज्यातील लोकांना एक नवीन पर्याय देणार, बिहारला मागासलेपणातून मुक्त करणार, असा अजेंडा घेऊन पीकेंनी आपल्या पदयात्रेला सुरुवात केली होती. या पदयात्रेत पीकेंनी संपूर्ण बिहार पिंजून काढले. आपल्या यात्रेदरम्यान पीकेंनी दर्जेदार शिक्षण, चांगल्या वैद्यकीय सेवा, राज्यात रोजगाराच्या संधी देण्यावर भर दिला. या पूर्व तयारीचा समारोप अखेर त्यांनी राजकीय पक्ष स्थापन करून केला. त्यांनी महात्मा गांधी जयंतीचा मुहूर्त साधत आपल्या 'जन सुराज' पक्षाची अधिकृत घोषणा केली आहे. माजी केंद्रीय मंत्री देवेंद्र प्रसाद यादव, प्रशासकीय सेवेतून राजकारणात आलेले पवन वर्मा, माजी खासदार मोनाजीर हसन यांच्यासह अनेकांच्या उपस्थितीत पाटण्यात जन सुराजचा शुभारंभ करण्यात आला. आपल्या पक्षाच्या माध्यमातून त्यांना बिहारच्या राजकारणात वादळ निर्माण करण्याची आशा आहे. प्रशांत किशोर यांनी दलित समाजातून आलेल्या मनोज भारती यांना जन सुराज पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष बनवले आहे.

## भाष्य

वसंत दीक्षित
9137866617

# काँग्रेसमुक्त भारत!!!

श्रध्येय महात्मा गांधींनी त्यांच्या मृत्यूच्या तीन दिवस आधी एक आणि एक दिवस आधी एक, अशी दोन पत्रे लिहिली होती. त्या पत्रांचा गोषवारा असा, की काँग्रेस ही भारतातील सर्वात जुनी राजकीय संघटना आहे. तिच्यामुळे भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळाले आहे; पण अजून स्वराज्य मिळणे बाकी आहे. ह्यासाठी काँग्रेस संघटनेने तिची राजकीय प्रतिमा त्यागून लोकसेवक संघाच्या रूपात धर्म, नीती व निःस्वार्थ भावाने शासन निरपेक्ष आर्थिक, सामाजिक व मूल्याधारित स्वातंत्र्य म्हणजे स्वराज्य निर्माण करण्यासाठी जुटावे. काँग्रेस सदैव वर्धिष्णू असावी. काँग्रेस नष्ट होऊन चालणार नाही. राष्ट्रासोबतच तिचा अंत व्हावा. महात्मा गांधींच्या उपरोक्त मनसुब्याचा अर्थ महात्माजींना देशात शासन निरपेक्ष, स्वनियंत्रित, स्वकर्तव्यपालनावर आधारित धर्मराज्य असावे, अशी अपेक्षा होती. त्यांच्या या अपेक्षेला महाभारताचा आधार आहे. पितामह भीष्म शरशय्येवर असताना भगवान श्रीकृष्ण युधिष्ठिराला घेऊन पितामहांना भेटायला गेले होते तेव्हा त्यांनी युधिष्ठिराला राजनीती सांगावी, अशी श्रीकृष्णांनी विनंती केली. भीष्म म्हणाले, भारतात अशी समाजव्यवस्था अस्तित्वात होती ज्यात राज्य नव्हते, राजा नव्हता, शिक्षा नव्हती, शिक्षा देणारा कोणी नव्हता, कारण सर्व समाजच धर्माचरणाने वागून परस्परांचे रक्षण करीत असे.

**'न वै राज्यं नैव राजासीत् न दण्डो न च दण्डिकः**
**धर्मेणैव प्रजाः सर्वे रक्षन्ति स्म परस्परम्।।'**

येथे 'धर्म' शब्दाचा अर्थ पूजा-संप्रदाय असा नसून कर्तव्य असा आहे, हे स्पष्ट आहे. 'कोई भए भूप हमें का नाही' ह्या उक्तिनुसार, गांधीजींना देशात त्यांच्या स्वप्नातले शासन-निरपेक्ष धर्मराज्य असावे अशी अपेक्षा होती, पण इंग्रजांनी बुद्धिभेद केला. आम्ही बुद्धिभेदाला बळी पडलो. शासननिरपेक्ष धर्मराज्याच्या ऐवजी धर्म-निरपेक्ष राजकारण निवडले गेले आणि देशात अधर्माचरणाचे पेव फुटले. गांधीजींच्या वारसदारांनीच गांधीजींना डावलले.

'संघटनेची राजकीय प्रतिमा त्यागावी', अशी जी सूचना महात्माजींनी केली होती त्याचा अर्थ काँग्रेस संघटना विसर्जित करावी, असा लावला गेला व लोक काँग्रेस-विरोधकांच्या प्रचाराला बळी पडले, असा कयास बांधून काँग्रेसचे समर्थक धास्तावले. भरीसभर मोदींनी काँग्रेसमुक्त भारताचा नारा दिला व त्याला जनतेने अभूतपूर्व प्रतिसाद दिला. त्यामुळे आगीत तेल ओतले गेले. जणू काही मोदींनी गांधीजींची काँग्रेस समूळ नष्ट करण्याचा विडा उचलला आहे, असे समजून काँग्रेस हादरली. धर्माधिष्ठित स्वराज्य व्हावे म्हणून अनुकूलता निर्माण करणे हा राजधर्म आहे हे जाणून, गांधींनी भारताच्या भावी शासकांनी अर्थात काँग्रेस संघटनेने राजकीय प्रतिमा त्यागून लोकसेवक संघाच्या रूपात कार्य करावे, अशी सूचना केली होती; पण तसे न करता काँग्रेस आकंठ राजकारणात बुडाली. ह्याचा अर्थ गांधीजींची काँग्रेस गांधी युगाबरोबरच लयाला गेली. आज जी काँग्रेस अस्तित्व राखून आहे ती कशी आहे? बाबांनी त्यांच्या हयातीत छत्री विकत आणली. त्यानंतर मुलांनी एकदा कापड बदलले, एकदा दांडी बदलली तरी छत्री बाबांच्या नावानेच ओळखली जाते, तसे काँग्रेसचे झाले आहे.

मोदींनी 'गांधीजींची काँग्रेस संपवा', असा नारा दिला नव्हता, तर 'काँग्रेसमुक्त भारताचा' नारा दिला होता. गांधीजींच्या मार्गापासून भ्रष्ट झालेल्या काँग्रेस पक्षाचा राजकारणातला प्रभाव संपावा एवढाच त्याचा अर्थ आहे. त्या नाऱ्यामुळे कोणी विचलित होण्याचे काहीच कारण नाही. राजकीय पक्षाचे नेतृत्व करणाऱ्या एका राजकीय नेत्याने तेवढ्याच हिरिरीने राजकारण करणाऱ्या एका राजकीय पक्षासंबंधात निवडणुकीच्या प्रचारादरम्यान प्रतिपक्षावर कुरघोडी करण्यासाठी दिलेला तो नारा आहे. २०१४ च्या निवडणूक प्रचारात मोदींनी तो नारा दिला होता; पण त्यानंतर काँग्रेस संपविण्यासाठी मोदींनी काहीच केले नाही, तसे करणे शक्यही नव्हते, कारण त्यावेळी मोदींच्या हाताशी कोणतीही शासकीय किंवा गैरशासकीय यंत्रणा नव्हती. काय करायचे ते त्यांनी जनतेवर सोपविले आणि जनतेने त्यांना अभूतपूर्व प्रतिसाद दिला. पुन्हा २०१९ त्याची पुनरावृत्ती झाली. खरेतर विरोधकांच्या संकल्पाने अथवा विरोधाने कोणतीही संघटना लयाला जात नाही. या उलट बाह्य तत्त्वांशी संघर्ष करताना कार्यकर्त्यांचा पीळ वाढत जातो व संघटना मजबूत होत जाते.

मात्र, जेव्हा स्वकियांचेच अधःपतन होते तेव्हा स्वधर्म असो, स्वराष्ट्र असो की संघटना असो अधोगतीला जाते. काँग्रेसच्या बाबतीत तसे काही घडले नाही ना?

काँग्रेसच्या वाटचालीचा विचार करता जे वास्तव समोर येते ते गांधीजींच्या अपेक्षांना छेद देणारे आहे. गांधीजींच्या नंतर काँग्रेसची धुरा सांभाळणाऱ्या नेतृत्वाने संघटनेची राजकीय प्रतिमा त्यागण्याचा प्रयत्नच केला नाही उलटपक्षी उत्तरोत्तर ती प्रतिमा अधिकाधिक गडद होत गेली.

स्वातंत्र्यपूर्व काळातील व्यापक लोकचळवळ स्वातंत्र्योत्तर काळात एक राजकीय पक्ष बनून संकोच पावली. गांधींना स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशात 'स्वराज्य' अपेक्षित होते. प्रत्येक राष्ट्राची एक अस्मिता असते ती स्वराज्य संज्ञेतल्या 'स्व'ने अधोरेखित होते; परंतु राजकीय लाभालाभाचे गणित जुळवताना काँग्रेसच्या विचारधारेतून हा 'स्व' वजा झाला असे दिसते. अनेक बाबतीत स्वकियांनीच गांधीजींचा पराभव केला आहे असे जाणवते. मग गांधीजींना अपेक्षित होती त्या काँग्रेसचे अस्तित्व आहे कुठे? एक गोष्ट वाचण्यात आली होती. शिक्षिका वर्गात इंग्रजी ग्रामर शिकवित होत्या. एका मुलीला उभी करून त्यांनी प्रश्न केला, 'मी एक सुंदर मुलगी आहे' ह्या वाक्याचा काळ कोणता? त्या मुलीने एकदा बाईंच्या चेहऱ्याकडे निरखून पाहिले व खाली मान घालून म्हणाली, 'भूतकाळ, मॅडम'. तशी आज गांधीजींची काँग्रेस भूतकाळात जमा झाली आहे.

संकोच पावत चाललेल्या वर्तमान काँग्रेस पक्षाचे पुढे काय होणार ते भविष्य काळाला ठाऊक.

आज पुन्हा एकदा काँग्रेस संघटना लोक सेवक संघाच्या रूपात उभी राहिली तर तिचे स्वागतच होईल; पण तसे होणे शक्य आहे काय? राजकीय ग्लॅमरमध्ये वावरणाऱ्यांना निरपेक्षपणे आणि आत्मविलोपी वृत्तीने राष्ट्रहितासाठी झटणाऱ्या संघटनेच्या पायात स्वतःला गाडून घेणे जमेल का? त्यासाठी जी वृत्ती असावी लागते तिचे भर्तृहरीने सुंदर वर्णन केले आहे-

**'क्वचित् भूमौ शय्या क्वचिदपि च पर्यंकशयनम्।**
**क्वचिच्छाकाहारः क्वचिदपि च शाल्योदनरुचिः।**
**क्वचित् कंथाधारी क्वचिदपि च दिव्यांबरधरो।**
**मनस्विकार्यार्थी न गणयति दुःखं न च सुखम्।।'**

राजकीय लाभालाभाची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या नेतृत्वाला अशा प्रकारच्या निरपेक्ष, निःस्वार्थी कार्यकर्त्यांची निर्मिती शक्य आहे काय?

'जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च' हे जसे माणसाला लागू आहे तसेच ते मनुष्य निर्मित व्यवस्थेलासुद्धा लागू आहे. त्याला काँग्रेस कशी अपवाद असेल? तरीही असे वाटते, की गांधीजींच्या तत्त्वावर अढळ निष्ठा बाळगणाऱ्यांनी निराश होण्याचे कारण नाही. प्रकृतीचा गुणधर्म आहे, की ती सृष्टीत संतुलन राखण्याचा प्रयत्न करते. निसर्गनियमानुसार एखादी मनुष्यनिर्मित व्यवस्था ढासळल्यासारखी किंवा नष्ट होत असल्यासारखी भासत असली, तरी आधीच तिचे बीजारोपण अन्यत्र कुठेतरी झालेले असते फक्त भौगोलिक केंद्र आणि माणसं बदललेली असण्याची शक्यता असते. भारतात तत्त्वाधिष्ठित, निरपेक्षपणे, निःस्वार्थ भावाने समाजाचे उन्नयन साधण्याची प्रयत्नांची पराकाष्ठा करणारी एखादी व्यवस्था उत्पन्न झाली आहे काय ह्याचा शोध घेणे आवश्यक आहे. मला असे वाटते की निराशा पदरात पडणार नाही कारण 'धृवं जन्म मृतस्य च' हे भगवंताचे विधान आहे, ते खोटे कसे ठरेल?

दीनदयालनगर, नागपूर-२२

## दृष्टिक्षेप



लोकनाथ काळमेघ
9096494894

# जंगलात 'हम करे सो कायदा'

वन्य पशू-पक्ष्यांचा अधिवास असलेल्या जंगलांमध्ये सक्तीच्या वसाहतीकरणाची प्रकरणे वाढत चालली आहेत. 'प्रोजेक्ट चित्ता' नावाचे प्रकरण आपल्याला माहीत आहे. म्हणजे ज्या वर्षी वसाहतवादी ब्रिटिशांपासून गुलाम वसाहत असलेल्या भारताला स्वातंत्र्य मिळाले, त्याच वर्षी १९४७मध्ये भारतातल्या जंगलातून अखेरचा चित्ता नामशेष झाला. भारताला स्वातंत्र्य आणि चित्त्याला मूठमाती! काय विलक्षण योगायोग म्हणायचा हा! अर्थात, भारतातून चित्ता नामशेष झाल्याची अधिकृत घोषणा झाली, १९५२मध्ये. त्यानंतर पुढची सत्तरएक वर्षे भारत चित्ता'मुक्त' देश होता. मग आले देवाजीच्या मना! 'प्रोजेक्ट चित्ता'ची जोरदार घोषणा झाली. जुन्या पिढीतल्या लोकांना १९७३मध्ये इंदिरा गांधींनी राबवलेला 'प्रोजेक्ट टायगर' आठवला. निसर्गप्रेम वगैरे बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी. हे म्हणजे, तुमचा 'प्रोजेक्ट टायगर', तर आमचा 'प्रोजेक्ट चित्ता'.

विश्वगुरुंच्या वाढदिवशी नामिबियाच्या जंगलातून मध्य प्रदेशातल्या कुनो नॅशनल पार्कात चित्ते आणले गेले. विधिवत, वाजतगाजत संरक्षित क्षेत्रात सोडले गेले; पण प्रत्यक्ष शिक्षेआधी जसे एखाद्या गुन्हेगाराला व्यवस्थेने योजलेल्या ट्रायलला सामोरे जावे लागते, तसे चित्त्यांच्या स्थलांतराच्या प्रवासातही घडले. बेशुद्ध केल्यानंतर डोळ्यांवर पट्टी बांधलेले, ऑपरेशन टेबलवर गलितगात्र अवस्थेतले चित्ते लोकांपर्यंत पोहोचले. चित्ते आणणाऱ्यांना देणेघेणे मात्र आपली शान उंचावण्याशी!

कुनोचा एवढा प्रचंड जंगल परिसर चित्त्यांसाठी मोकळा केला. त्यावर कोट्यवधी रुपये खर्च केले आणि तिथे चित्ते एका पाठोपाठ एक माना टाकताहेत. यावर उपाय म्हणून त्यानंतर दक्षिण आफ्रिकेतून चित्ते आयात करण्याची टूम निघाली. तीही पूर्णत्वास गेली; पण त्यांच्या वाट्याला नामिबियन चित्त्यांच्या वाट्याला आलेले भाग्य आले नाही. कारण यांच्या आगमनाचा सोहळा झाला की नाही, याचा कुणाला पत्ताच लागला नाही. कुनोतला घटनाक्रम हा साधारण असा आहे- कुनोमध्ये या घडीला २६ चित्ते आहेत. त्यात १३ बछडे आणि पौंगडावस्थेतल्या चित्त्यांचा समावेश आहे. मुळात, प्रोजेक्ट ॲक्शन प्लान आखला गेला, त्यानुसार कुनोमध्ये चित्त्यांची संख्या २१ असणेच अपेक्षित होते. म्हणजे, या घडीला ५ अधिकचे चित्ते कुनोत राज्य करताहेत. फॉरेस्ट डिपार्टमेंटच्या मते, या अधिकच्या पाचांमुळेच कुनोची जैवसाखळी बिघडली आहे. किती बिघडली आहे, तर २०२२पासून चित्त्यांचे मुख्य भक्ष्य असलेल्या कुनोच्या जंगलातल्या चितळांची संख्या २२५०नी म्हणजेच, तब्बल २५ टक्क्यांनी गपकन घटली आहे.


कुनो आणि गांधीसागरमध्ये प्रस्थापित व्यवस्थेने जे काही रामायण-महाभारत घडवून आणले आणि जे काही बिबट्याला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले, त्यावर एका निवृत्त फॉरेस्ट अधिकाऱ्याने म्हणे तीव्र आक्षेप घेतलाय. त्याचे म्हणणे, चितळांची संख्या घटण्यात बिबट्यांचा हात आहे, ही थिअरी बोगस आहे. ज्या प्रमाणात आणि ज्या वेगात चितळांची संख्या घटलीय, ते पाहता बिबटे निवडून निवडून फक्त चितळांचाच फडशा पाडताहेत, हे काही खरे नाही.

एक मुद्दा कुनो जंगलातल्या चितळांच्या संख्येच्या अंदाजे मोजमापाचासुद्धा आहे. दोन दशकांपासून या क्षेत्रातल्या प्रकल्प वैज्ञानिकांनी म्हणे, २००६मध्ये दर स्क्वेअर किमी मागे ५ चितळे, २०११ हीच संख्या दर स्क्वेअर किमीमागे ३६, २०१२मध्ये ५२ आणि २०१३मध्ये ६९, अशी अंदाजे संख्या नोंदवली होती. हा अंदाज काढताना त्यांनी कॅमेरा ट्रॅपिंग आणि डिस्टन्स सॅंपलिंग अशा दोन पद्धती अवलंबल्या, त्यातून चितळांची दोन प्रकाराने घनता सांगितली. ३८ आणि २३. आता यातला जो कमी आकडा आहे, त्यानुसार चितळ टास्क फोर्सने आपला स्वतःचा अंदाज सांगितला. त्यानुसार 'कुनो वाइल्डलाइफ सॅंक्चुरी'त ३४५ स्क्वेअर किमी परिसरात २०२१मध्ये चितळांची संख्या अंदाजे ८००० होती. त्यानंतरच्या काळात मध्य प्रदेश सरकाने कुनोच्या जंगलात ७५० चितळांचे इतर जंगलातून स्थलांतर घडवून आणले आहे. सप्टेंबर २०२२मध्ये भक्ष्य चितळांची पहिली तुकडी कुनोमध्ये सोडली गेली. वर्षभरात ६५०० चितळ जंगलातून नामशेष झाले. तेव्हापासून परिस्थितीत सुधार नाही. हे ६५०० चितळ कोणी फस्त केले. चित्त्यांनी? बिबट्यांनी? की....

पाळेमुळे रुजलेल्या जंगलातून उचलायचे, दुसऱ्या जंगलात नेऊन सोडायचे. नामिबियातून उचलले, भारतात आणून सोडले. भारतातल्या एका जंगलातून उचलले, दुसऱ्या जंगलात आणून सोडले. परिस्थितीशी कसे जुळवून घेत असतील, चित्ता, वाघ आणि चितळ? अशा वेळी अनोळखी अधिवासात प्राण्यांना नेऊन सोडल्याने काय साधते?

जंगलात शेवटी कोणाचा कायदा चालतोय? कोणाच्या हौसमौजेसाठी, कोणाच्या चुकांवर पांघरूण घालण्यासाठी चालतोय? उत्तर खूपच सोपे आहे, 'हम करे सो कायदा'. ब्रिटिश, डच, पोर्तुगीज आणि फ्रेंचाच्या नावे खडे फोडता फोडता वसाहतोत्तर काळातल्या भारतात निषिद्ध मानली गेलेली वसाहतवादी मानसिकता अंगी पुरेपूर मुरवून जंगलांमध्ये मनात येईल, तेव्हा वसाहती वसवल्या जाताहेत, मनात येईल तेव्हा हलवल्या आणि संपवल्याही जाताहेत. मुळात, माणसाने जंगलांवर अतिक्रमण केलेय. बिबट्या किंवा वाघ मानवी वस्तीत शिरला, असे म्हणणे हे असत्यकथन आहे. कुनो आणि गांधीसागर, याप्रमाणेच अगदी विदर्भाचे नंदनवन असलेल्या मेळघाटच्या जंगलात आपला मनमानी कायदा चालवून माणसाने असत्यकथनाला असभ्यतेची आणि असंस्कृतपणाचीही जोड दिलेली आहे.

## देवाचिये द्वारी



नरेंद्र नाशिरकर
9850352130
साई कथाकार-प्रबोधनकार, नागपूर

# पक्ष, विपक्ष एवढाच महत्त्वाचा 'पितृपक्ष'!

(मागील लेखावरून पुढे)

आज स्मार्ट फोनचे युग आहे; पण परमात्म्याने बनविलेला स्मार्ट फोन म्हणजे 'मानव प्राणी'! मानवरूपी स्मार्ट फोनचे सिम कार्ड म्हणजे आत्मा! याला नियंत्रित करणारे अंतराळातील सॅटेलाईट म्हणजे परमात्मा, परमशक्ती! सिम कार्ड आणि सॅटेलाईटला जोडणाऱ्या अनेक कंपन्या आहेत. प्रत्येकाचे नियम- लोगो मात्र वेगवेगळे असून प्रत्येक कंपन्या आपलेच महत्त्व सांगत असतात. त्याचप्रमाणे आत्मा आणि परमात्म्याच्या मध्ये आमच्यात अनेक धर्म या कंपन्यांप्रमाणे आहेत. प्रत्येकाला आपलाच धर्म श्रेष्ठ वाटतो. सिम कार्ड ॲक्टिवेट केल्याशिवाय सॅटेलाईटसोबत जुळत नाही. आत्मारूपी सिम कार्डसुद्धा ध्यान धारणा, साधना केल्याशिवाय परमात्मारूपी सॅटेलाईटशी जुळत नाही. स्मार्ट फोनप्रमाणे शरीररूपी फोनलासुद्धा योग्य भोजन देऊन रोज चार्जिंग करावे लागते. चार्जप्रमाणे रिचार्जसुद्धा महत्त्वाचा असतो. तेव्हाच सॅटेलाईट कनेक्ट होतो. आम्हाला चांगले कर्म, भक्ती करून रिचार्ज करीत टॉकटाईम मिळवावा लागतो. स्मार्ट फोनमध्ये दोन प्रकारची मेमरी असते. एक फोन मेमरी व दुसरी सिम कार्डची मेमरी! तशीच शरीर बुद्धीची मेमरी आणि आत्म्याची मेमरी!

खराब झालेल्या मोबाइलचे सिम कार्ड नवीन मोबाइलमध्ये टाकल्या जाते, तसेच शरीररूपी मोबाइल एक्सपायर झाला, की आत्मारूपी सिम कार्ड नवीन देहात टाकल्या जाते. मानवी शरीर निरूपयोगी झाल्याने अंत्यविधीने नष्ट केल्या जाते. नवीन मोबाइलमध्ये जुने सिम टाकल्यावर त्या सिममधील मेमरी पुन्हा काम करते. आमच्या आत्म्यारूपी सिममध्ये मेमरी डाटा असतो. म्हणूनच पूर्वजन्मीच्या ज्ञानामुळे १६व्या वर्षी संत ज्ञानेश्वर ग्रंथ लिहू शकले. आजही ५ ते ७ वर्षांची मुले अविश्वनीय काम करताना दिसतात. मोठ्या पंडितांना लाजवेल असे पाठांतर, गायन, वादन, भाषण करून थक्क करणाऱ्या लहान मुलांचे रहस्य हिच आत्म्यारूपी सिम कार्डची मेमरी असू शकते. आज आम्हाला एक गुगल ॲप दिशा दाखवते. अनेक ॲप आहेत जी सर्व कामे मिनिटात करून देतात. जुन्याकाळी बसल्या ठिकाणी सर्व सांगणारे ऋषी, मुनी, संत, महात्मे इतिहासात होतेच ना! विश्वास जागविणाऱ्या ज्ञानालाच आम्ही विज्ञान म्हणतो. आजच्या विज्ञानावर विश्वास ठेवतो; पण जुन्याकाळी ग्रंथातील विज्ञानावर विश्वास ठेवणे जड जाते.

सनातन हे विज्ञान असून दूरदर्शी आहे. जेनेटिक्स सायन्सनुसार आपण आपल्या पूर्वजांकडून जिन्सच्या रूपाने, रंग, रूप, शरीरयष्टी, कला इत्यादी घेत असतोच! मी या घराण्यात जन्माला आलो...मी यांचा नातू आहे... मी यांचा वंशज आहो, हे सांगत फायद्याकरिता उपयोगही करीत असतो. मग त्यांचा आदराने ऋणी राहून धन्यवाद देण्याचा प्रत्येक वर्षातील काळ म्हणजे...पितृपक्ष! सनातनमध्ये प्रत्येक गोष्टी मागे विज्ञान आणि दूरदृष्टी असते.

कोरोनात कळले, मानवासाठी अनमोल ठेवा प्राणवायू! हा प्राणवायू दुपटीने देणारे दोन वृक्ष वड आणि पिंपळ! पण या वृक्षांच्या बीजप्रक्रियेत कावळ्याची महत्त्वाची भूमिका! या वृक्षांची बीजं थेट आपण पेरली तरी झाड उगवत नाही. कावळ्याच्या बीज सेवनानंतर विष्ठेतून बाहेर आल्यावरच बीजातून वृक्ष निर्मिती होते. कावळ्यांचा प्रजनन काळ म्हणजे फक्त हा भाद्रपद! याच महिन्यात अंडी घालतात. याकाळात त्यांना विशेष पोषक आहाराची गरज असते. म्हणून पितृपक्षात पोषक आहार कावळ्यांना देत वड, पिंपळाच्या बीज प्रक्रियेला चालना देऊन मानवाकरिता ऑक्सिजनची सोय केलेली आहे. म्हणूनच पूर्वजांना स्मरून कावळ्याला घास देण्याची परंपरा!

कोणतेही सरकार तुमच्या ऑक्सिजनची सोय करा, असे सांगणार नाही आणि आम्हीही करणार नाही हे पूर्वजांना माहीत होते. म्हणून ही परंपरा! पण प्रथा-परंपरेला पुराणातील वांगी म्हणत आधुनिकतेचा दिंडोरा पिटत आम्ही आमच्या पायावर कुऱ्हाड तर मारत नाही ना? विचार करा. म्हणून जसे आमचे आई-वडील आमच्या भविष्याची प्रगती लक्षात घेऊन काही गोष्टी सांगतात, तसेच पूर्वजांनी आमच्या साठी परंपरेने सांगण्याचा प्रयत्न केला आहे. अजूनही वेळ गेली नाही... 'जागाल तर जगाल, विचार कराल तर वाचाल'!

(समाप्त)

## वाचक विचार मंच

# नवरात्रीच्या नऊ दिवसांत नऊ रंगांच्या साड्या परिधान न करता देवीची उपासना वाढवा!

वेद, शास्त्रे, पुराणे, भगवद्‌गीता, रामायण, महाभारत, दुर्गासप्तशती आदी ग्रंथ यांत कुठेही 'नवरात्रीत ९ दिवस ९ रंगांच्या साड्या परिधान करा', असे दिलेले नाही. 'धुतलेले स्वच्छ वस्त्र परिधान करा. नऊवारी साडी असेल तर उत्तम', असे दिले आहे. मात्र, गेल्या काही वर्षांपासूनच नवरात्रीत एक स्तोम माजविले जात आहे, की नऊ दिवसांत नऊ वेगवेगळ्या रंगांच्या साड्या आणि त्याच रंगांची आभूषणे परिधान करणे. अनेक मोठ्या आस्थापनेत ही नऊ रंगांची नवरात्री साजरी केली जाते आणि पारितोषिकेही दिले जातात; पण या नऊ रंगांचा देवीशी काहीही संबंध नाही. असे म्हणतात की, ही एक 'बिजनेस संकल्पना' आहे. त्या अनुषंगाने काही महिला नवीन साडी किंवा पोशाख खरेदी करतात. मार्केटिंग करणाऱ्या आस्थापनांनी विविध क्लृप्त्या वापरून सध्या प्रत्येक क्षेत्रात पाय पसरले आहेत. त्यामुळे सणांचे पावित्र्य न्यून होऊन बीभत्सपणा आला आहे. नवरात्री साजरी करण्याचा खरा उद्देश कुठेतरी लोप पावताना दिसत आहे. दरवर्षी नऊ दिवस हे देवीच्या उपासनेत घालविणे आणि त्यातून देवीतत्त्व वृद्धिंगत करणे आवश्यक आहे. या काळात महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती या तिन्ही रूपांतील देवींची सेवा करावी. आपल्या परंपरा जपत माळ घालणे, घट पूजन करणे, घागरी फुंकणे, देवीच्या नामजपासह सर्व करणे हेच अंगीकारून देवीची उपासना करणे निकडीचे बनले आहे. सक्षमता, सौंदर्यता, सबळता, सृजनशीलता, स्वरक्षा या आणि अशा अनेक गुणांची वृद्धी देवीच्या विविध रूपांतून स्वतःत करून घेणे हीच खरी नवरात्री नव्हे का?



**आल्हाद माळगांवकर**, पनवेल

## गुल्लेर



नरेंद्र इंगळे
9561226572

# फुकटची एसटी

'हा सखाबुढा कुठी गेला होता रे? आताच उतरला एसटीतून.'

'गेला अशीन दवाखान्यात.'

'नाही ना.. हा बुढा आगुदरच्या दिवशी वायरची थैली घेऊन जाते अन् दुसऱ्या दिवशी वापस येते.'

'मंग त्या बुढ्यालेच विचारु आपून.. ओ आबा.. कुठी गेले होते?'

'एसटी फुकट आहे आपल्याले.. तिकीट पडत नाही.'

'फुकट आहे म्हनून हिंडतच राह्यता काय झोरा घेऊन? तिसऱ्या दिवशी फिराले जाता तुम्ही.. आजीजवळ गमत नाही काय?'

'बुढीले आयकू येत नाही.. डोयानं दिसत नाही.'

'अरे पन गेलते कुठी तुम्ही?'

'भंगारवाडीले गेलो होतो इनीच्या भेटीले.'

'तुमची इन बिमार आहे काय?'

'नाई नाई.. सहज भेटीले गेलो होतो.. मी गेलो की गमते तिले.'

'रातभर राह्यले काय इनीच्या घरी?'

'मले राहाचा आग्रह केला.. बासुंदीचा पावनचार केला.'

'इनीच्या घरी लय चकरा होऊन राह्यल्या तुमच्या.. एसटी फुकट आहे म्हनून लय फायदा घेऊन राह्यले.'

'अरे हा बुढा रंगीला आहे ना.. बुढीले सोडून इनीच्या नांदी लागला.'

'इन जवान आहे की म्हतारी आहे आबा?'

'साठची आहे पन आजून जवान दिसते.. तरतर धंदा करते. मले पान कुटून देते.. गरम भाकरचा काला करून देते.'

'म्हनूनच गमते तुमाले इनीच्या घरी.. इव्हाई काही म्हनत नाही काय?'

'इव्हाईबुवा मयातच असतात झोपाले.. कुचीत घरी झोपतात.'

'मंग काय पाहा लागते.. पुरी सोय होते तुमची.'

'इन म्हने आठ दिवस राहा.. पन इतक्या दिवस राह्यनं सोभत नाही आपल्याले.'

'राहा लागत होतं.. तेवढीच सेवा घडते.. नाहीतरी बुढी काही सोय करत नाही तुमची.'

'तरी हप्त्यातून दोनखेप चक्कर असतेच आपला. गेलो की रातभर राह्यतो.'

'सांगा.. फुकटच्या एसटीचा असा फायदा घेऊन राह्यला बुढा.'

'पाहो.. फुकटचा तेवढा फायदा घेत ना काय? पावनचार होते.. गोष्टीमाष्टी होतात.. येरी दुसरं काय होते आपल्याकून?'

## स्ट्राईक रेट

मावशी म्हणाली पेंद्या
चल बाबा लवकर निघ
साहेबांच्या दरवाज्यावर
लागली भली मोठी रीघ
प्रत्येकाला वाटते
नको वनवासात नांदणे
त्यापेक्षा गोविंदबागेतील
शीतल आहे चांदणे
हातात तुतारी घेतल्यास
आम-दारातून प्रवेश थेट
मागच्यावेळच्या लढतीतला
बघून घे स्ट्राईक रेट
कमळाईच्या मेगाभरतीत
आपण झालो होतो मेंढरे
सिल्व्हर ओकच्या सावलीत
करून घेऊ उखळ पांढरे
औरों को तो कोई पुछता नहीं
मगर इनकी आज भी क्रेझ है
तलवार पुरानी है तो क्या हुआ
धार अभी भी तेज है

**ॲड. अनंत खेळकर**, अकोला

## संवाद

# महिला आरक्षण प्रत्यक्षात केव्हा?

आपल्या राज्यघटनेत स्त्री- पुरुषांना समानता आणि प्रसंगी महिलांना प्राधान्य, या तत्त्वांची अंमलबजावणी होण्याकरिता देशाची पहिली सार्वत्रिक निवडणूक सन १९५२ मध्ये झाल्यानंतर सन १९९३ मध्ये घटनेत ७३ वी व ७४ वी दुरुस्ती केली गेली तेव्हा देशातील महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ टक्के आरक्षणाची तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयान्वये राज्य सरकारांना त्यांच्या अखत्यारीतील जागांमध्ये ३३ टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले. महाराष्ट्र राज्यात कालांतराने आरक्षणाचा हाच टक्का ३३ वरून ५० टक्क्यांपर्यंत नेण्यात आला. सरकारांनी कायद्यांत बऱ्याच चांगल्या तरतुदी करून ठेवल्या आहेत. प्रत्यक्षात मात्र त्यांची अंमलबजावणी करण्यात त्याकडे जाणते अजाणतेपणे दुर्लक्ष केले जात आहे. असे म्हणावे लागते कारण सन २०१९ मध्ये भाजपाने १६ टक्के, तर काँग्रेसने १३ टक्के महिलांना उमेदवारी दिली. सन २०२४ च्या निवडणुकीत टक्केवारीत विशेष फरक पडला नाही. परिणामी सध्याच्या १८ व्या लोकसभेत ५४५ खासदारांमध्ये ७४ महिला खासदार आहेत आणि राज्यसभेतील एकूण २२४ खासदारांमध्ये २४ महिला खासदार आहेत. सध्या होणाऱ्या विधानसभा निवडणुकांवरून उमेदवारांच्या आरक्षणाची, महिला आरक्षणाची मोठी चर्चा घडवून आणली जात आहे. मात्र, किती महिलांचा यांत समावेश केला जाईल याबद्दल साशंकता आहेच.

आज देशातील लोकसंख्येच्या ५० टक्के मतदार महिला आहेत; परंतु महिला खासदारांची संख्या त्या प्रमाणात का नाही यावर चर्चा होणे आवश्यक आहे. महिलांच्या मतदानाची टक्केवारी पुरुषांच्या तुलनेत जवळपास सारखीच आहे. जागतिक पातळीवर देशातील महिलांच्या राजकारणातील सहभागात शेवटून विसावा क्रमांक लागतो हे फारच धक्कादायक, पण वास्तव आहे. महाराष्ट्रात महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण लागू केल्यावर आरक्षणाचा काय परिणाम होतो हे पाहण्यासाठी सन १९९८ मध्ये राज्याच्या ग्रामीण भागात जे सर्वेक्षण केले गेले त्यात तेथून ग्रामपंचायतीत निवडून आलेल्या महिलेला घरकामात प्राधान्य द्यावे, की ग्रामपंचायतीच्या कामकाजात सहभागी व्हावे, असे प्रश्न भेडसावू लागले तेव्हा त्या सेविकेला उत्तर न सापडल्याने ती बुचकळ्यात पडून निरुत्तर झाली. कदाचित अशाच काही कारणांनी महिलांची राजकारणात सहभागी होण्याची संख्या कमी असल्याचे दिसून येत आहे. अशा प्रकारांतून राजकारणात पुरुषांचा सहभाग वाढत गेला आणि वर्तमानात त्याचे परिणाम दिसून येत आहेत.

**राजन पांजरी**
मुंबई, मो. नं.: ९८१९७००८१८

# मातेचे अवयव शिजवून खाणाऱ्या मुलाची फाशी कायम

वृत्तसंस्था

**मुंबई** : समाजातील विकृततेचे किळसवाणे दर्शन अलीकडे वारंवार घडताना दिसते आहे. असाच एक किळसवाणा आणि त्यापेक्षाही जास्त घृणास्पद प्रकार कोल्हापुरातून समोर आला होता. या प्रकरणी न्यायालयाने अत्यंत कठोर धोरण अवलंबत असे विकृत कृत्य करणाऱ्या मुलाची फाशी कायम ठेवली आहे.

मुलाने आईची हत्या केली आणि हत्येनंतर तिच्या अवयवयांचे काही भाग शिजवून खाल्ले. मुलाने केलेले हे कृत्य अमानवी आणि विकृत आहे असे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने नोंदवले आहे. तसेच याप्रकरणी त्याची फाशीची शिक्षा कायम ठेवली आहे. कोल्हापूर येथे राहणाऱ्या सुनील कोंचीकोरवी याने आई दारूसाठी पैसे देत नसल्याने आईची हत्या केली. केवळ यावरच तो थांबला नाही, तर त्यानंतर त्याने आईचेचे अवयव शिजवून खाल्ले होते.

# राजस्थानची अनेक रेल्वे स्थानके उडवण्याची धमकी

## रेल्वे स्थानकांवर सुरक्षा वाढवली

देशोन्नती वृत्तसंकलन

**हनुमानगड** : राजस्थानच्या अनेक रेल्वे स्थानकांना बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाल्याने पोलीस आणि प्रशासनात घबराट पसरली आहे. रेल्वे स्थानकांवर सुरक्षा वाढवण्यात आली आहे. हनुमानगड जंक्शनच्या स्टेशन अधीक्षकांना रेल्वे स्थानके उडवून देण्याची धमकी देणारे पत्र मिळाले. या पत्रात रेल्वे स्थानकांवर बॉम्ब टाकण्याची धमकी देण्यात आली होती. वास्तविक, आज एका अज्ञात व्यक्तीने हनुमानगड रेल्वे स्थानकाच्या स्टेशन अधीक्षकांना पत्र दिले आणि तेथून निघून गेले. स्टेशन अधीक्षकांनी पत्र उघडून वाचले तेव्हा त्यांना धक्काच बसला. हे पत्र जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेच्या नावावर असून त्यात हनुमानगड जंक्शन रेल्वे स्थानकासह राजस्थानमधील अनेक रेल्वे स्थानकांवर बॉम्बस्फोट करण्याची धमकी देण्यात आली होती

# मद्रास उच्च न्यायालयाने सद्गुरूंना फटकारले

## दोन मुलींना डांबून ठेवल्याचा आरोप

वृत्तसंस्था

**मद्रास** : जग्गी वासुदेव म्हणजेच सद्‌गुरु यांच्या ईशा फाऊंडेशनच्या कोयंबतूरच्या आश्रमात आपल्या दोन मुलींना डांबून ठेवल्याचा आरोप करत एका व्यक्तीने मद्रास उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. दरम्यान, या प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान, न्यायालयाने आध्यात्मिक गुरू जग्गी वासुदेव यांनी आपल्या मुलीचा विवाह केला आहे तर इतर मुलींना संन्यासी राहायला कसे सांगताय? असा सवाल करत मद्रास उच्च न्यायालयाने सद्गुरुंना फटकारले आहे. जग्गी वासुदेव म्हणजेच सद्‌गुरु यांच्या ईशा फाऊंडेशनच्या कोयंबतूरच्या आश्रमाची पोलिसांकडून तपासणी करण्यात आली.



**पणजी :** राज्यात आतापर्यंत ६६ हजार ५०० भाडेकरूंची पडताळणी पूर्ण झाली आहे. यामध्ये उत्तर गोव्यातील २९ हजार १००, तर दक्षिण गोव्यातील ३७ हजार ४०० भाडेकरूंचा समावेश आहे. पुढील नऊ दिवस दोन्ही जिल्ह्यांत भाडेकरू पडताळणीची मोहीम मोठ्या प्रमाणात राबवली जाणार आहे.

# उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना मोफत सिलिंडर

## योगी आदित्यनाथ यांची महिलांना भेट

**लखनौ:** आगामी नवरात्री आणि दिवाळी या सणांच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी उत्तर प्रदेशला मोठी भेट दिली आहे. दिवाळीच्या मुहूर्तावर, मुख्यमंत्री योगी यांनी प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या सर्व लाभार्थ्यांना मोफत सिलिंडर देण्याची घोषणा केली आहे. याचा फायदा राज्यातील सुमारे दोन कोटी कुटुंबांना होणार आहे. या महोत्सवात मोफत सिलिंडर हे महिलांसाठी एखाद्या उत्तम भेटवस्तूपेक्षा कमी असणार नाही.

सणांच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अधिकाऱ्यांची बैठक घेतली आणि सर्वांना आवश्यक मार्गदर्शक सूचना दिल्या. यावेळी त्यांनी पंतप्रधान उज्ज्वला योजनेंतर्गत महिलांना दिवाळीत मोफत सिलिंडर देण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. यासंबंधीची सर्व औपचारिकता संबंधित अधिकाऱ्यांनी पूर्ण करावी, असे मुख्यमंत्री म्हणाले.

# शारीरिक संबंधानंतर रक्तस्त्राव झाल्याने तरुणीचा मृत्यू

**नवसारी** : प्रियकरासोबत शारीरिक संबंध ठेवल्यानंतर काही वेळातच २३ वर्षीय तरुणीचा मृत्यू झाल्याचा प्रकार समोर आला आहे. २३ सप्टेंबर रोजी गुजरातमधील नवसारी जिल्ह्यात ही घटना घडली आहे. शारीरिक संबंधानंतर मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने तरुणीचा मृत्यू झाला. मात्र, तिला रुग्णालयात नेण्याऐवजी प्रियकर रक्तस्त्राव थांबवण्याचे मार्ग ऑनलाइन शोधत राहिला. मेडिकल रिपोर्टनुसार, महिलेचे वजानल टिशू फाटले होते. त्यामुळे तिला मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होत होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तरुणी आणि तिचा प्रियकर एका हॉटेलमध्ये थांबले होते. तिथे दोघांनी शारीरिक संबंध ठेवले. मात्र, काही वेळातच तरुणीला मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होऊ लागला. ज्यामुळे दोघेही खूप घाबरले. यावेळी तरुणीला वैद्यकीय मदत मिळणे अपेक्षित होते, पण तसे झाले असते कदाचित तरुणीचा जीव वाचला असता.



# इराणच्या इस्त्रायलवरील हल्ल्यानंतर कच्च्या तेलात ३ टक्क्यांची वाढ

# कच्चा तेलाच्या किंमतीत वाढ

**इराण :** इस्रायल-हमास, इस्रायल-हेझबोला यांच्यातील युद्धानंतर आता इस्रायल-इराण युद्ध पेटले आहे. इराणने मंगळवारी (१ ऑक्टोबर) रात्री इस्रायलची राजधानी तेल अविववर मोठा हल्ला केला आहे. इराणने इस्रायलवर २०० बॅलिस्टिक क्षेपणास्रे डागल्यानंतर संपूर्ण इस्रायलमध्ये सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे. महत्त्वाचे म्हणजे या संघर्षाचा परिणाम कच्चा तेलाच्या किंमतीवर बघायला मिळतो आहे. इराणच्या हल्ल्यानंतर कच्चा तेलाच्या किंमतीत जवळपास ३ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

रॉटर्सने दिलेल्या वृत्तानुसार, आंतरराष्ट्रीय बाजारात ग्लोबल बेंचमार्क ब्रेंट क्रूडचे दर २.६ टक्क्यांनी म्हणजेच १.८६ डॉलरने वाढून ७३.५६ डॉलरपर्यंत पोहोचले आहेत. तर वेस्ट टेक्सॉस इंटरमीडिएट क्रूडचे दर प्रति बॅरल २.४ टक्क्यांनी म्हणजे १.६६ डॉलरने वाढून ६९.८३ डॉलरपर्यंत वाढले आहेत. या हल्ल्याचा परिणाम फक्त क्रूड ऑईलवरच नाही, तर शेअर बाजारावरही पडला आहे. जगभरातील अनेक शेअर बाजारात घसरण झाल्याचे बघायला मिळाले आहे.

## पेट्रोल-डिझेलचे दर वाढण्याची शक्यता

साधारण आंतरराष्ट्रीय बाजारात कच्चा तेलाचे भाव वाढले, तर त्याचा परिणाम भारतील पेट्रोल-डिझेलच्या दरावर होतो. त्यामुळे आता आंतरराष्ट्रीय बाजारात कच्चा तेलाचे दर वाढल्याने भारतील तेल वितरक कंपन्या पेट्रोल-डिझेलचे दर वाढवू शकतात, असे सांगितले जात आहे. त्यामुळे याची झळ भारतीयांना बसण्याची शक्यता आहे.

# इराणने मोठी चूक केली, याची मोठी किंमत चुकवावी लागेल

वृत्तसंस्था



**इस्त्रायल :** इराणने मंगळवारी केलेल्या हल्ल्यावर इस्रायलने तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. इराणने मोठी चूक केली असून त्याची किंमत त्याला चुकवावी लागेल, असे इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी म्हटले आहे.

सुरक्षा मंत्रिमंडळाच्या बैठकीच्या सुरुवातीला नेतान्याहू म्हणाले की, जो कोणी त्यांच्यावर हल्ला करेल, त्याला आम्ही प्रत्युत्तर नक्कीच देऊ. इराणने आज रात्री खूप मोठी चूक केली आणि त्याची किंमत चुकवावी लागेल,' असे त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर एका पोस्टमध्ये लिहिले. जाफा येथील घृणास्पद दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांप्रती मी संवेदना व्यक्त करतो आणि जखमींना लवकरात लवकर बरे होण्याची इच्छा व्यक्त करतो. क्षेपणास्त्र हल्ल्याप्रमाणेच या दहशतवादी हल्ल्यामागेही खुनी मार्गदर्शक हात होता असेही ते म्हणाले आहे. नेतान्याहू इथेच थांबले नाहीत. त्यांनी पुढे लिहिले, इराणने एक मोठी चूक केली, आणि त्याची किंमत ते नक्कीच चुकवणार. तेहरानमधील राजवट आमचा बचाव करण्याचा आणि आमच्या शत्रूंकडून किंमत काढण्याचा आमचा निर्धार समजत नाही. सिनवार आणि बहिरे यांना हे समजले नाही, नसराल्लाह किंवा मोहसेन यांनाही हे समाज समजले नाही अर्थात, तेहरानमध्ये असे लोक आहेत ज्यांना हे समजत नाही. आम्ही ठरवलेल्या नियमाप्रमाणेच काम करू. इराणने इस्रायलवर केलेल्या हल्ल्याचा जपान आणि अमेरिकेने निषेध केला आहे. जपानचे नवे पंतप्रधान शिगेरू इशिबा म्हणाले की, इराणने इस्रायलवर केलेले क्षेपणास्त्र हल्ले अस्वीकार्य आहेत. आम्ही याचा तीव्र निषेध करतो; परंतु त्याच वेळी, आम्ही परिस्थिती निवळण्यासाठी आणि संपूर्ण युद्धात बदलण्यापासून रोखण्यासाठी (युनायटेड स्टेट्ससह) सहकार्य करू इच्छितो.

# लालूप्रसाद यादवांचा जावई निवडणूक मैदानात

**रेवाडी (हरियाना) :** हरियाणातील बहुचर्चित अहिरवाल (यादवबहुल) पट्ट्यातल्या रेवाडी आणि अटेली हे दोन्ही मतदारसंघ चर्चेत आहेत. या भागातले अहिरवाल नेते आणि मोदी सरकारमधील मंत्री राव इंद्रजितसिंह यांच्या कन्या आरती राव या अटेलीमधून भाजपच्या उमेदवार आहेत. त्यांचे कट्टर विरोधक अहिरवाल नेते कॅप्टन अजयसिंह यादव यांचे पुत्र चिरंजीव राव रेवाडीमधून काँग्रेसचे उमेदवार आहेत.

# भारत, इस्रायलच्या दूतावासात कडक सुरक्षा

## इराणच्या युद्धाची धग दिल्लीपर्यंत पोहोचली!

**नवी दिल्ली:** दिल्लीतील इस्रायली दूतावासाची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. अब्दुल कलाम रोड बॅरिकेड्स लावून बंद करण्यात आला आहे. दिल्ली पोलिसांच्या वाहनांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मीडियालाही इस्रायली दूतावासात जाऊन व्हिडिओग्राफी करण्याची परवानगी दिली जात नाही. इराणने इस्रायलवर केलेल्या हल्ल्यानंतर मध्यपूर्वेत तणावाचे वातावरण आहे. अशा स्थितीत भारतातील इस्रायल दूतावासात कोणताही कट होऊ नये म्हणून दिल्लीत सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. 'या भागात कोणत्याही प्रकारचा निषेध होऊ नये यासाठी दिल्ली पोलिसांनी इस्रायल दूतावासाची सुरक्षा व्यवस्था वाढवली

# डेन्मार्कचे कोपनहेगन हादरले, इस्त्रायल दूतावासाजवळ दोन बॉम्बस्फोट




**डेन्मार्क :** डेन्मार्कची राजधानी कोपनहेगन येथील इस्रायल दूतावासाच्या परिसरात दोन बॉम्बस्फोट झाले आहेत. या प्रकरणी डेन्मार्क पोलीस तपास करत आहेत. कोपनहेगनच्या उत्तरेकडील भागात इस्रायल दूतावास परिसरात दोन स्फोट झाले असल्याची माहिती डेन्मार्क पोलिसांनी दिली आहे. या घटनेत कोणीही जखमी झालेले नाही आणि ते घटनास्थळी प्राथमिक तपास करत आहेत, असे कोपनहेगन पोलिसांनी सोशल मीडियाएक्स वरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

स्थानिक प्रसारमाध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, या भागाची घेराबंदी करण्यात आली असून मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. बॉम्बस्फोट आणि इस्रायली दूतावास यांच्यात काही संबंध आहे की नाही हे आताच काही सांगू शकत नाही, असेही पोलिसांनी म्हटले आहे. कोपनहेगनच्या उत्तरेकडील हेलेरप उपनगरात इस्रायलसह इराण, थायलंड, तुर्की आणि रोमानिया या देशांची दूतावास आहेत. स्टॉकहोममधील इस्रायली दूतावासाजवळ संशयास्पद गोळीबार झाला; त्याच रात्री कोपनहेगनमध्ये स्फोट झाल्याची घटना घडल्याचे स्वीडिश माध्यमांनी म्हटले आहे. मध्य पूर्वेत तणाव वाढल्याच्या दरम्यान या घटना घडल्या आहेत. इराणने मंगळवारी रात्री इस्रायलवर अनेक क्षेपणास्त्रे डागली आणि इस्रायलने इराणला या हल्ल्याची किंमत मोजावी लागेल, असा इशारा दिला आहे. इराणच्या क्षेपणास्त्रांनी मोसादचे मुख्यालय, इस्त्रायली हवाई तळाला लक्ष्य केले.

# हिमाचल प्रदेशला केंद्राची 189 कोटींची मदत

## १२ हजार कोटींचे नुकसान



**शिमला** : हिमाचल प्रदेशला भेडसावत असलेल्या आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने राज्याला मोठा दिलासा दिला आहे. गृह मंत्रालयाने राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून केंद्रीय वाटा म्हणून हिमाचल प्रदेशसाठी आगाऊ सहाय्य म्हणून १८९.२० कोटी रुपये मंजूर केले आहेत. देशातील १४ पूरग्रस्त राज्यांना ५,८५८.६० कोटी रुपये देण्यात आले आहेत. २०२३ मध्ये हिमाचलमधील मान्सून आपत्तीमध्ये सुमारे १२ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे.

या संदर्भात केंद्राच्या पथकाने तीन वेळा येऊन सर्वाधिक नुकसान झालेल्या जिल्ह्यांचे मूल्यांकन केले. त्यानंतर हा अहवाल गृह मंत्रालयाला देण्यात आला. याआधीही केंद्र सरकारने आपत्ती निवारण म्हणून हिमाचलला निधी दिला आहे. पूरग्रस्त आसाम, मिझोराम, केरळ, त्रिपुरा, नागालँड, गुजरात, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि मणिपूर या राज्यांमध्ये आंतर-मंत्रालयी पथके पाठवण्यात आली असून, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार नैसर्गिक आपत्तीग्रस्त राज्यातील लोकांचे दुःख कमी करण्यासाठी त्यांच्या खांद्याला खांदा लावून उभे आहे. गृह मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, हिमाचल व्यतिरिक्त बिहारला ६५६ कोटी रुपये, बंगालला ४६८ कोटी रुपये आणि महाराष्ट्राला १४९२ कोटी रुपये देण्यात आले आहेत. याशिवाय आंध्र प्रदेश, आसाम, गुजरात, केरळ, मणिपूर, मिझोराम, नागालँड, सिक्कीम, तेलंगणा, त्रिपुरा या राज्यांनाही मदत देण्यात आली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, आंतर-मंत्रालयीन पथकाने आसाम, मिझोराम, केरळ, त्रिपुरा, नागालँड, गुजरात, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि मणिपूरमध्ये झालेल्या नुकसानीचे आधीच मूल्यांकन केले आहे.

# हिमाचलमध्ये 56 वर्षांनंतर आढळले 4 जवानांचे मृतदेह

## 1968 मध्ये कोसळले होते हवाईदलाचे विमान

वृत्तसंस्था



**शिमला :** हिमाचल प्रदेशातील रोहतांग खिंडीत ५६ वर्षांनंतर चार भारतीय जवानांच्या मृतदेहाचे अवशेष सापडले आहेत. डोगरा स्काऊटस् (लष्कर) आणि तिरंगा पर्वतीय बचाव पथकांच्या संयुक्त मोहिमेअंती हे अवशेष बाहेर काढण्यात आले. ७ फेब्रुवारी १९६८ मध्ये भारतीय हवाईदलाचे एएन-१२ विमान दिब्रुगडहून लेहला जात असताना रोहतांग खिंडीत कोसळले होते. १०२ सैनिक त्यात होते.

२०१९ पर्यंत सापडले ५ मृतदेह २००३ मध्ये या विमानाचे अवशेष सापडल्यानंतर भारतीय सैन्याने, विशेषतः डोगरा स्काऊटस्ने २००५, २००६, २०१३ आणि २०१९ मध्ये शोधमोहिमा राबवल्या. हा भूभाग जटिल असल्यामुळे २०१९ पर्यंत फक्त पाच मृतदेह सापडले होते. सप्टेंबर २०२४ मधील मोहिमेत हे ४ मृतदेह सापडले. मलखान सिंग, कॉन्स्टेबल नारायण सिंग आणि थॉमस चरण यांचे हे मृतदेह आहेत. चौथ्या मृतदेहाच्या अवशेषांची अद्याप ओळख पटलेली नाही. ७ फेब्रुवारी १९६८ रोजी भारतीय हवाई दलाच्या विमानाने चंदीगडहून लेहसाठी उड्डाण केले. या विमानात १०२ लोक होते, पण हिमाचलमधील रोहतांग खिंडीजवळ विमानाशी संपर्क तुटला आणि त्यानंतर बटालच्या वरच्या चंद्रभागा रेंजमध्ये विमान कोसळले. यामध्ये सर्वांचा मृत्यू झाला होता. ठार झालेल्यांमध्ये थॉमस चेरियन हे केरळचे रहिवासी होते. ते भारतीय लष्कराचे शिपाई होते. अपघातानंतर त्याचा मृतदेह कोठे गेला, हे कोणालाही कळू शकले नाही. मात्र, आता तब्बल ५६ वर्षांनंतर त्यांचे अवशेष सापडले आहेत. -----

# काँग्रेस विसर्जित करण्याची गांधीजींची सूचना मान्य करा

## देवेंद्र फडणवीसांची विरोधकांना मागणी

**नवी मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून आज, बुधवारी (०२ ऑक्टोबर) राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त मुंबईत लाँग मार्च काढण्यात आला. मंत्रालय जवळच्या गांधी पुतळ्यापासून ते लालबहादुर शास्त्री यांच्या पुतळ्यापर्यंत हा मार्च काढण्यात आला. यासंदर्भात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारला असता त्यांनी टीका केली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या या मोर्चासंदर्भात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारला असता त्यांनी काँग्रेसवर निशाणा साधला. ते म्हणाले की, गांधी जयंती हा आंदोलनाचा दिवसच नाही आहे. गांधी जयंतीच्या दिवशी तुम्हाला जर वाटत असेल तर शांतपणे बसून त्यांच्या विचारांवर आणि कार्यक्रमांवर आत्मचिंतन केले पाहिजे; परंतु आज गांधीजींच्या नावाचा राजकीय उपयोग जे लोक करत आहेत, त्यांना मी एक आठवन करून देऊ इच्छितो. जर तुम्ही गांधीजींचे खरे अनुयायी असाल तर गांधीजींनी स्वातंत्र्यानंतर सूचना केली होती की, काँग्रेसची उपयोगता संपली आहे.

# इस्रायलमधील जाफा येथे दहशतवादी हल्ल्यात ७ ठार

**तेल अवीवः** इस्रायलची राजधानी तेल अवीवजवळील जाफा येथे मंगळवारी संध्याकाळी दहशतवादी हल्ला झाला. हल्लेखोरांनी केलेल्या अंदाधुंद गोळीबारात ७ जणांचा मृत्यू झाला, तर ८ जण जखमी झाले. दरम्यान, दोन्ही दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आल्याचे इस्रायलने म्हटले आहे. जाफा शहरातील जेरुसलेम रस्त्यावर ही घटना घडली.



नवी दिल्ली: आज देश राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५५ वी जयंती साजरी करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक राजकीय नेत्यांनी राजघाटावर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना अभिवादन करत आदरांजली वाहिली. मोदी म्हणाले की, सर्व देशवासियांच्या वतीने आम्ही आदरणीय बापूंना त्यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करतो.

# स्पर्धा परीक्षेत गडबड केल्यास ५ वर्षांची कैद

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी मुंबई** : गेल्या काही काळापासून सातत्याने होणाऱ्या पेपर फुटीला आळा घालण्यासाठी कायद्याचा मसुदा विधिमंडळात सादर करण्यात आला होता. या मसूद्याला विधानसभेने आणि विधानपरिषदेने मान्यता दिल्यानंतर महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) २०२४ हा कायदा मंजूर झाला होता. यानंतर आता राज्यपालांची सही झाल्यानंतर राज्यात कायदा लागू झाला आहे. यानुसार, आता स्पर्धा परीक्षेत अनुचित मार्गाचा अवलंब करणाऱ्या वा कोणताही अपराध करणाऱ्या व्यक्तीला किमान तीन आणि कमाल पाच वर्षे कैदेची शिक्षा सुनावली जाणार आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने विद्यापीठ परीक्षांमधील गैरव्यवहार रोखण्यासाठी एक कायदा १९८२ मध्ये केला होता. त्यात एक वर्षाच्या कैदेच्या शिक्षेची तरतूद होती. १९९६ मध्ये एमपीएससीने एक अधिसूचना काढून या कायद्यातील तरतुदी आपल्या परीक्षांसाठीही लागू केल्या. मात्र, तेव्हापासून आतापर्यंत महाराष्ट्रात स्पर्धा परीक्षेतील गैरव्यवहार रोखण्यासाठी वेगळा कायदाच नव्हता.

## दोषी कंपनी ४ वर्षांसाठी काळ्या यादीत

अपराध करणाऱ्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना ३ वर्ष ते ५ वर्ष कारावास आणि १० लाख रुपये दंड भरावा लागणार आहे. या शिक्षेसोबतच एक कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे. दोषी कंपनीला चार वर्षांसाठी काळ्या यादीत टाकणार आहे. रोख दंड भरला नाही तर भारतीय न्याय संहिता २०२३ मधील तरतुदींनुसार अतिरिक्त शिक्षा दिली जाईल. यामध्ये स्वतः उमेदवार, मदत करणारी व्यक्ती यांचा समावेश असेल. या अधिनियमांतर्गत येणारे सर्व अपराध हे दखलपात्र, अजामीनपात्र व आपसात न मिटवण्याजोगे असतील असे राज्य सरकारने नुकत्याच जारी केलेल्या अधिनियमात स्पष्ट केले आहे. डीवायएसपी किंवा सहायक पोलिस आयुक्तांच्या दर्जा वा वरचा अधिकारी परीक्षांमधील गुन्ह्यांचा तपास करेल.

## १० लाख रुपयांपर्यंत दंडाचीही तरतूद



# प्रयोगशाळेत तयार केला 'जगातला पहिला' रुबी

**लंडन :** सिंथेटिक डायमंड म्हणजेच कृत्रिम पद्धतीने हिरे तयार केले जातात. आता शास्त्रज्ञांनी प्रयोगशाळेत मौल्यवान रुबी तयार केला आहे खरेतर रुबी कृत्रिम नाही. रुबी तयार होण्यासाठी नैसर्गिक वातावरणात जास्त वेळ लागतो; परंतु हीच प्रक्रिया प्रयोगशाळेत जलद केली जाते प्लॅटिनम दागिने तयार करण्यासाठीच्या प्रक्रियेदरम्यान संशोधकांनी ही किमया केली आहे. या प्रकारची जगातील ही पहिलीच प्रक्रिया आहे.


# केज मतदार संघ चाटून-पुसून खाल्ला!

## पृथ्वीराज साठे पुराव्यासह आ. नमिता व अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराची पोलखोल

केज/पुण्यभूमी प्रतीनिधी

केज च्या शासकीय विश्रामगृहात पत्रकारांसमोर वार्तालाप करताना केज मतरसंघात प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून त्याची माहिती येत्या आठ दिवसात पत्रकार परिषदे घेऊन संबंधित अधिकारी व आमदार नमिताताई मुंदडा यांची पोलखोल करणार असल्याच सांगितल.माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी औपचारिक पत्रकार बरोबर गप्पा मारताना सांगितल की केज व अंबाजोगाई शहर तसेच ग्रामीण भागात रस्ते, नाली यात प्रचंड मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून एकाच रस्त्यावर दोन दोन योजनेंतर्गत निधी दिला तसेच कुठे रस्ता न करताच त्याचे बील उचलले गेले आहेत. नगरोत्थान असो डिपीडिसी असो,आमदार निधी असो प्रत्येक कामात भ्रष्टाचार झाला असून त्याला संबंधित कार्यालयातील अधिकाऱ्यांनी





सुद्धा साथ दिली आहे.

ज्यावेळेस या भ्रष्टाचार संबंधित माहिती गोळा करण्याची प्रयत्न केले तर या अधिकाऱ्यांवर दबाव टाकून माहिती देण्यास असहकार्य केले तसेच माहिती देण्यास एकतर टाळाटाळ केली किंवा विलंब लावला असा आरोप त्यांनी अधिकाऱ्यांवर लावला.मतदार संघातील शहर असो की तालुके प्रत्येक रस्ता नाली चे कामे आपल्या संबंधित गुत्तेदार व त्यांच्या एजन्सीकडून काम करून घेतले व प्रचंड माया कमावले असा ही आरोप माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी आमदार नमिताताई मुंदडा यांच्यावर लावला तसेच याची सर्व पोलखोल येत्या आठ दिवसात पत्रकार परिषदेत करणार असल्याच सांगितल.तर राष्ट्रवादी काँग्रेस चे जेष्ठ नेते तथा विधानसभा अध्यक्ष सुरेश पाटील यांनी सांगितल की राष्ट्रवादीकडून पृथ्वीराज साठे यांनाच उमेदवारी भेटणार असून तशी आम्ही सर्व नेत्यांना घेऊन निवडून आणण्याची तयारी करत आहोत.येणाऱ्या काळात केज मतरसंघातून आमदार म्हणून पृथ्वीराज साठे हेच दिसतील असे ही ते म्हणाले आहेत.

# केजमध्ये लॉवाल्यांना खाकीचा दणका!

**कारवाई :** पाच लॉज मालकांसह मॅनेजरविरुद्ध गुन्हा



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज पोलिसांनी राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या लॉजची अचानक तपासणी करीत शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन करणाऱ्या पाच लॉजच्या मालक व मॅनेजरविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.केज ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या आदेशावरून पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी १ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री १२.१५ ते १२.४५ वाजेच्या सुमारास केज – मांजरसुंबा या राष्ट्रीय महामार्गावरील मस्साजोग येथील संघर्ष लॉज व अजिंक्य लॉज, उमरी फाट्यावरील पान २ वर...

# नाथ प्रतिष्ठानकडून नवरात्रोत्सव

**आयोजन:** जत्रा मैदानात देवीची केली स्थापना

परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठानच्या वतीने प्रथमच नवरात्र उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, शहरातील जत्रा मैदान येथे साकारण्यात आलेल्या स्व. पंडित अण्णा मुंडे सभामंडपामध्ये आज शारदीय नवरात्रोत्सवाचे विधिवत पूजन करून देवीची स्थापना करण्यात आली. हे पूजन राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके यांच्यासह त्यांच्या पत्नी सौ. रेणुकाताई सोळंके यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.




यावर्षी प्रथमच हा सोहळा आयोजित करत नाथ प्रतिष्ठानच्या वतीने ना.धनंजय मुंडे यांच्या संकल्पनेतून व ज्येष्ठ नेते वाल्मीक अण्णा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तराखंड येथील केदारनाथ मंदिराचा जिवंत देखावा दुधगंगा (मंदाकिनी) नदीसह, भीमशिला व आदी बाबी साकारण्यात आले आहे. हा देखावा न्यू क्षीरसागर, संभाजीनगर यांनी साकारला असून या देखाव्याच्या माध्यमातून सर्व भाविकांनी प्रत्यक्ष केदारनाथांचे दर्शन परळीत अनुभवावे, असे आवाहन ज्येष्ठ नेते तथा नाथ प्रतिष्ठान चे कार्यवाह वाल्मिक अण्णा कराड यांनी केले आहे. चार धाम पैकी एक व अत्यंत पवित्र मानल्या जाणाऱ्या केदारनाथ देखाव्याचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी युवक जिल्हाध्यक्ष सुशांतसिंह पवार, नगरसेवक शंकर आडेपवार, विजय भोयटे, पान २ वर...

# राख वितरणमध्ये करोडोंचा अपहार

**बोगसगिरी:** उद्योगांना जुन्याच दराने राखेचे वितरण!



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी शहरातील औष्णिक विद्युत केंद्रातील अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचाराचा कळस केला असून नुकत्याच लघु उद्योगा साठी झालेल्या इ- ऑक्शन मध्ये राखेचा दर ६१९ रुपये प्रतीटन प्रमाणे झालेला असतांनाही थर्मल मधील चीफ इंजिनिअर सुनील इंगळे यांनी मनमानी कारभार चालवून सर्व लघु उद्योगांना जुन्याच २१० रुपये प्रतिटन प्रमाणे कोरडी राख दिली जात आहे,या मुळे शासनाचा दिवसाला लाखो रुपयांचा महसूल बुडत असून याला थर्मल प्रशासन जवाबदार आहे.

परळी औष्णिक विद्युत केंद्रातील तिन्ही संचमधून दररोज टोटल २७०० टन एवढी कोरडी राख उत्पादित होते त्या पैकी २०% कोरडी राख लघु उद्योगा साठी आरक्षित आहे तिची संख्या दररोज ५४० पान २ वर...

# परळी तहसीलदार गरिबांच्या मुळावर!

**मिलिंद घाडगे:** पालकमंत्री तात्काळ लक्ष घाला?

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तसेच आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या घरकुलासाठी वाळू उपलब्ध करून देण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत दिनांक २८ जुलै २०२३ रोजी शासन परिपत्रक काढून महाराष्ट्रातील संपूर्ण जिल्हाधिकारी यांना आदेश देण्यात आले आहेत. राज्यातील नागरिकांना तसेच प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या घरकुलासाठी सक्षम प्राधिकारी यांनी सादर केलेली यादी संबंधित तहसीलदार यांनी तपासून तशी लेखी परवानगी दिल्यानंतर वाळू जप्त केलेल्या साठ्यातून विनामूल्य उपलब्ध करून देण्याची शासनाचे आदेश आहेत. परंतु या शासन निर्णय व



आदेशाची पायमल्ली परळी तहसील कार्यालयाकडून होताना दिसून येत आहे. परळी तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू मिळण्यासाठी परळी तालुक्यातील विविध सामाजिक संघटनांनी आंदोलन करून वाळू मिळण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले आहेत.

परंतु प्रशासनाकडून गरजवंत लाभार्थ्यांना मोफत रेती वाटप करण्यासाठी जाणीवपूर्वक टाळाटाळ करण्यात येत असून तहसील कार्यालयाकडून उपविभागीय कार्यालयाकडे उपविभागीय कार्यालयाकडून पंचायत समिती कार्यालयाकडे केवळ वेळ निभाऊन नेण्यासाठी एकमेकाकडे विनाकारण पत्रव्यवहार करून घरकुल लाभार्थींना वेटिश धरण्याची काम तहसील प्रशासनाकडून होताना दिसून येत आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २८ जुलै २०२३ च्या शासन आदेशाचा निर्णयाची सर्रास पायमल्ली होताना दिसून येत आहे. सदर बाब गंभीर असून गोरगरीब घरकुल लाभार्थींच्या जखमेवर मीठ चोळण्याचा हा प्रकार आहे. डेपोतील रेती व जप्त केलेली रेती घरकुल लाभार्थ्यांना देण्यासाठी मौजे पोहणेर येथील गोदावरी नदी पात्रातील जप्त केलेल्या वाळूचा पंचनामा पान २ वर...

# बीडमध्ये मंत्री रामदास आठवलेंचा सत्कार!

**दयानंद उजगरे:** रिपाइं कार्यकर्त्यांनी सामील व्हावे

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची केंद्रीय मंत्री मंडळात तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा भव्य सत्कार सोहळा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली शनिवार (दि.५) ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर होणार आहे.



मंत्री रामदास आठवले यांच्या भव्य सत्कार सोहळ्याचे औचित्य साधून भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजक पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली बीड शहरातील राजुरीवेस पासून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापर्यंत रामदास आठवले यांची भव्य रॅली दुपारी ३:३० वाजता काढण्यात येणार आहे. मंत्री रामदास आठवले यांची भव्य रॅली व सत्कार सोहळा ऐतिहासिक करण्यासाठी बीड शहरातील रिपाइं पदाधिकारी, महिला, शाखाप्रमुख, युवा कार्यकर्ते, क्रियाशील सदस्य यांनी हजारोच्या पान २ वर...

# सोयगाव महाराष्ट्र बँकेचे सर्व्हर बंद

**समस्या:** खातेदारांना करावा लागतोय गैरसोयीचा सामना

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

बनोटी (ता.सोयगांव) येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेचे सर्व्हर गेल्या सहा दिवसापासून बंद पडल्याने सर्व व्यवहार ठप्प पडल्याने ग्राहक संतप्त. लाडक्या बहिणांना मारावा लागत आहेत चकरा.

बँक ऑफ महाराष्ट्र नेटवर्क नसल्याने सहा दिवसापासून ग्राहकांचे व्यवहार झाले नसल्याने ग्राहक संतप्त झाले आहेत तालुक्यातील खेड्यापाड्यातील १०-२० किमी अंतरावरून पायपीट करून असंख्य ग्राहक बँकेत आले होते. बँकेचे नियमित खातेदारही मोठ्याप्रमाणावर आले होते.महीन्याचा चौथा शनिवार नंतर रविवार, महात्मा गांधी जयंतीच्या सुट्ट्या आल्याने ग्राहकांनी गर्दि केली त्यात सोमवारी, मंगळवारी , बुधवारी बँकेचे सर्वर बंद पडल्याने असंख्य ग्राहकांचे आर्थिक व्यवहार झाले नसल्याने मोठे नुकसान झाले




तर व्यापारी लोकांना आर्थिक फटका बसला बँकेत कामकाजच होत नसल्याने चांगलीच गैरसोय झाली. सर्वर चालु होण्याची वाट बघून,कातावलेल्या ग्राहकांनी कर्मचाऱ्यांना घेराव घालून प्रश्नाचा भडीमार केला सर्व्हर सुरळीत न झाल्यास बँकेला टाळे ठोकण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. खेड्या -पाड्यातील असंख्य लोक बाजार करण्यासाठी लागणारा पैसा बँकेतून काढण्यास येतात. तसेच खाते खोलण्यास, लाडकी बहिण योजनेचा तीसरा हप्ता, सोयाबीन, कपाशी अनुदान, घरकुलाचे ,शौचालयाचे अनुदानाचे बँक खात्यात जमा झालेले पैसे काढण्यासाठी तसेच बँक खात्याची केवायसी करण्यासाठी सकाळी दहा वाजल्यापासून पान २ वर...

# रोटरीच्या कार्यात सहभागी व्हावे

**डॉ.सुरेश साबू :** शिक्षक-शिक्षकांना नेशन बिल्डर अवॉर्ड



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी


रोटरी इंटरनॅशनल ही जगातील दोनशेहून अधिक देशात मैत्री, समाजसेवा व इतर अत्यावश्यक उपक्रमासह काम करणारी सर्वात मोठी व प्रतिष्ठित अशी सामाजिक संस्था असून आपण या संस्थेचे सदस्य होऊन मानवी कल्याणासाठी हातभार लावा असे आवाहन रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२चे प्रांतपाल रो डॉ सुरेश साबू यांनी केज रोटरीच्या 'नेशन बिल्डर अवॉर्ड' च्या वितरण प्रसंगी केले. यावेळी सहप्रांतपाल रो विवेक गंगणे, नगराध्यक्षा तथा केज रोटरीच्या माजी अध्यक्षा सीता बनसोड, केज नगरपंचायतचे मुख्याधिकारी सचिन देशपांडे, फर्स्ट लेडी निर्मलादेवी रोटरी क्लब ऑफ केज चे विद्यमान अध्यक्ष रो प्रकाश कामाजी व सचिव रो अनंत तरकसबंद इत्यादींची उपस्थिती होती.केज रोटरीच्या वतीने केज तालुक्यातील दहा शिक्षक-शिक्षिकानां 'नेशन बिल्डर अवॉर्ड' अर्थात राष्ट्रनिर्माते शिल्पकार पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले त्यावेळी प्रांतपाल डॉ साबू बोलत होते. पान २ वर...

## नियोजन नगर तथागत बुद्धिस्ट सोसायटी इंडियाची रॅली

# धम्मभुमी ते दिक्षाभुमी जागृती अभियान

नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी तथागत बुद्धिस्ट सोसायटी इंडिया बुधदिस्ट सेमिनरी यांच्या वतीने ६/१०/२४ रोजी नगर डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून स्वाभिमान धम्मभूमी ते दीक्षाभूमी नागपूर धम्मदीक्षा जागृती अभियान रैलीचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती तथागत बुद्धिस्त सोसायटी इंडिया नगर व जागृती अभियानाचे संयोजक संजयजी कांबळे यांनी दिली

सकाळी १० वा नगर येथुन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण व अभिवादन करुन धम्मदीक्षा जागृती अभियानाची सुरुवात होणार आहे दुपारी राहुरी येथे भोजन व प्रवचन तसेच दिक्षा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे तद नंतर स्वाभिमान धम्मभूमी हरेगाव श्रीरामपूर येथे वंदन उद्घाटन व दीक्षा कार्यक्रमानंतर नेवासा फाटा संविधान चौकात अभिवादन



करून छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद) शिवाजीनगर बीड बायपास बुद्ध विहार मार्गे अभियान जालना कडे प्रस्थान करणार आहे

सिंदखेडराजा शाहू रोड खामगाव तदनंतर बुधवारी महाथेरो बी संघपाल बुद्धभूमी अकोला नंतर अमरावती नालंदा बुद्ध बुद्ध विहार शेंदाळा येथे मुक्काम व दि ११/१०/२४ रोजी दीक्षाभूमी नागपूर येथे दाखल होणार असुन १२/१०/२४ रोजी नागपूर दिक्षाभुमी कडुन परतीचा प्रवास होणार आहे

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी हरेगाव श्रीरामपूर येथे १६ डिसेंबर १९४९ रोजी स्वाभिमानी धम्मपरिषद पान २ वर...

### जागृती अभियानात सामील व्हा: कांबळे

अहमदनगर जिल्हा हा धम्ममय होण्यासाठी तथागत बुद्धिस्ट सोसायटी इंडियाच्या वतीने एक रथ तयार करण्यात आलेला आहे तो धम्मरथ संपूर्ण गावागावात जाऊन धम्माचा प्रसार करेल व धम्म वाढवण्यास मदत होईल त्यासाठी प्रयत्न करत आहे या जागृती अभियानास चांगला प्रतिसाद देऊन सहभागी व्हावे असे संजयजी कांबळे यांनी आवाहन केले आहे

# बीड झोनमध्ये मुलींच्या संघाची बाजी

**क्रीडा :** आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा



सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आणि भगवान महविद्यालय, आष्टी यांच्या संयुक्त विद्यमाने दि.३० स्पटेंबर सोमवार रोजी बीड झोन आंतर महाविद्यालयीन कबड्डी क्रीडा स्पर्धेचे आयोजन भगवान महविद्यालय, आष्टी येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत सिरसाळा येथील श्री पंडितगुरु पार्डिकर महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने यशवंतराव चव्हाण कॉलेज अंबाजोगाई, ड हंबर्डे कॉलेज आष्टी व आनंदराव धोंडे कॉलेज कडा या बलाढ्य संघाना एक तर्फी हरवत प्रथम क्रमांक पटकावला. या आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत एकुण ०४ संघांनी सहभाग घेतला होता.

तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व मॉडेल डिग्री कॉलेज घनसावंगी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर महाविद्यालयीन मुलींच्या सेंटर झोन कबड्डी स्पर्धेत बीड झोन च्या मुलींनी द्वितीय क्रमांक पटकावला. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या निकिता लंगोट, गौरी पाखले, कावेरी आडे, हर्षदा बोराटे व रितु राठोड पान २ वर...